
मूल्य ४० पैसे

# माणूस



१६।९।६७

" आपण माझ्यापासून किमान पंचवीस-तीस फूट अंतर राखून चाला. सी. आय्. डी. आपल्या मागावर आहे."
ही प्रथमच मिळालेली सूचना ध्यानात ठेवून,
वेडीवाकडी वळणे घेत, ससेमिरा चुकवीत
भरवस्तीपासून दूर दूर, एका अनोळखी इसमाच्या
मागोमाग ' माणूस प्रतिनिधी ' चालला होता . . .

✳

*स्थळ : श्रीनगर – समय : ऐन मध्यान्ह*

[ कव्हर पान १ वरून ]

हॉटेल चिनारला वळसा घेतला . . .
टागोर हॉल मागे टाकला . . .
वस्ती अधिकाधिक विरळ होऊ लागली . . .
रस्त्यावरील वाहतूक जवळजवळ थंडावलेली . . .
कोपऱ्याकोपऱ्यावर पोलिसांचे जथे . . .
सारे शहरच सैन्याने कसे आवळून धरलेले आहे !
कोणी पाळतीवर नाही असे पाहून

⁂

*माणूस प्रतिनिधी*

हळूच एका फाटकातून त्या अनोळखी इसमापाठोपाठ
एका तिमजली लाकडी जुनाट घरात प्रवेश करतो.
तिसऱ्या मजल्यावरील एक अगदी बाजूची खोली.

⁂

*अरे ! हा तर भूमिगतांचा अड्डा !*

पकडवॉरंट्स असलेले दहा-वीस कार्यकर्ते . . .
कोणी चार दिवस, कोणी आठ दिवस
घरापासून दूर राहिलेले . . .
पुढील दार अपरात्रीच पोलिसांनी ठोठावले आणि
मागील दाराने अंधारात, लपत छपत अंगावरच्या
अर्धवट कपड्यांनिशी एक कांबळे खांद्यावर टाकून
रात्रभर रस्त्यांवरून अनवाणी पायाने हिंडलेले
असेही काही . . .
दाढ्या वाढलेले, खाण्यापिण्याची आबाळ . . .
शहरात भरवस्तीच्या सर्व भागांवर चोवीस
तासांचा कर्फ्यू

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : सोळावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. ऑगस्ट, २८

आपणांला बऱ्याच दिवसांपूर्वी हे पत्र लिहावयाचे होते, पण ते राहूनच गेले.

'माणूस'च्या ८ जुलैच्या अंकात आपल्या लेखात पान ५३ वर कानिटकर यांच्या हॉटेलचा जो उल्लेख आला आहे तो चुकीचा आहे, हे कळविण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. लंडनला माझे धाकटे बंधू कृष्ण प्रल्हाद Indian Students' Home चालवितात. त्यांनी तेथे एक घर विकत घेतले आहे. त्यांच्या घरी फक्त राहण्याची सोय आहे. तेथे एका वेळी १५–१६ विद्यार्थी राहतात. प्रा. पोतदार लंडन येथे गेले असताना माझ्या बंधूंकडेही गेले होते. प्रा. पोतदारांच्या पुस्तकात त्याचा उल्लेख आहे. माझे बंधू लंडन येथे एक प्रेसही चालवितात.

आपला

**रा. प्र. कानिटकर**

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# छागला यांच्या राजीनाम्याच्या निमित्ताने

श्री म. क. छागला यांचा राजीनामा सर्वस्वी अनपेक्षित होता. भाषेच्या प्रश्नावरून परराष्ट्र मंत्र्याने राजीनामा द्यावा, ही गोष्ट वरकरणी विसंगत दिसत असली तरी संसदीय संकेतांचा विचार करता तीत वावगे असे काहीही नाही. अर्थात या संसदीय संकेतांची फारच थोड्या मंत्र्यांना जाणीव असते ही गोष्ट वेगळी. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी रेल्वे मंत्र्यावरही पडते हा संसदीय संकेत मान्य करून त्यानुसार राजीनामा देणारे लालबहादुर शास्त्री एखादेच निघतात. एरवी दररोज रेल्वे-अपघात झाले तरीही मला राजीनामा देण्याचे काहीच कारण नाही असे मानणारे स. का. पाटीलच अधिक. खुर्चीबद्दलची आसक्ती हा या प्रतिपादनाचा मूळ आधार. हे चित्र केवळ भारतातच दिसते असे नाही. कार्डिफलगतच्या कोळसा खाणीतील अपघाताबाबत चौकशी समितीने संबंधित खात्याच्या मंत्र्यावर ठपका ठेवूनही त्या मंत्र्याने राजीनामा देण्यास नकार दिल्याचे उदाहरण नुकतेच लोकशाहीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रिटनमध्येही घडले आहे. ही झाली खात्याच्या जबाबदारीची गोष्ट. परंतु छागला यांच्या बाबतीत तर तसे काही घडलेले नाही. केंद्र सरकारचे भाषाविषयक धोरण त्यांना पसंत पडले नाही व मंत्रिमंडळ सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार कार्य करीत असल्यामुळे हे भाषाविषयक धोरण जर आपल्याला संमत नसेल तर मंत्रिमंडळातून बाहेर पडणे संसदीय शिष्टाचाराला धरून होईल या विचाराने छागला केंद्रीय मंत्रिमंडळातून बाहेर पडलेले आहेत.

सध्याचे केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुण सेन हे नावाजलेले शिक्षणतज्ज्ञ आहेत. वाराणसी विद्यापीठाचे कुलगुरूपद सांभाळत असतानाच श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांची शिक्षणमंत्री म्हणून नेमणूक केली. गेल्या वीस वर्षांत सर्वांत अधिक दुर्लक्षिले गेलेले, पण सर्वांत महत्त्वाचे खाते असे शिक्षण खात्याचे वर्णन केले जात असे. कोणाकडेही सोपवावे असे खाते म्हणजे शिक्षण खाते, असा या खात्याचा लौकिक होता.

शिक्षण खात्याचा हा लौकिक नाहीसा करणे इंदिरा गांधी यांना आवश्यक वाटले आणि म्हणून प्रथमच शिक्षणकार्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीची शिक्षणमंत्रि पदावर नेमणूक झाली. विद्यार्थ्याला सर्व शिक्षण मातृभाषेतच मिळाले पाहिजे या सूत्राचे डॉ. त्रिगुण सेन हे कट्टे पुरस्कर्ते आहेत.

## वैचारिक निष्ठा

एक तत्त्व म्हणून हे सूत्र ठीक आहे. परंतु कोणताही निर्णय करताना केवळ त्याच्या तात्विक बाजूचाच विचार करून चालत नाही. व्यवहाराचाही विचार करणे आवश्यक ठरते. एखाद्या विद्यार्थ्याला रसायनशास्त्रातील अवघड सिद्धांत त्याच्या मातृभाषेत शिकावयास मिळाले तर ते त्याला लवकर समजतील या विचाराबाबत कोणाचेच मतभेद होणार नाहीत. त्याचप्रमाणे आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर येथील विविध प्रादेशिक भाषांच्या विकासाला सरकारमार्फत व विद्यापीठांमार्फत हातभार लागणेही आवश्यक आहे. परंतु उच्च शिक्षणही मातृभाषेत देणे कितपत व्यवहार्य आहे याचाही गंभीरपणे विचार व्हावयास हवा, असा छागला यांचा आग्रह होता व या आग्रहाशी प्रामाणिक राहण्याच्या निर्धारातून त्यांचा राजीनामा जन्मास आला. खुर्चीचा मोह सोडून वैचारिक निष्ठेपायी मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे धैर्य दाखविल्याबद्दल छगला यांचे मला तरी अभिनंदन करावेसे वाटते.

प्रत्येक राष्ट्राची त्यातील भिन्न भिन्न राष्ट्रघटकांची खास आपली अशी भाषा असते, संस्कृती असते. या भाषेचा वा संस्कृतीचा रास्त अभिमान बाळगणे, मातृभाषेच्या विकासासाठी जिद्दीने प्रयत्न करणे या सर्व गोष्टी कौतुकास्पद आहेत याबाबत दुमत नाही. एक मराठी भाषिक नागरिक म्हणून मराठीचा इतका विकास व्हावा, की जगातील सारे ज्ञानभांडार माझ्या मातृभाषेतही उपलब्ध आहे, असे मोठ्या अभिमानाने मला सांगता आले पाहिजे, असे मला वाटणे साहजिक आहे. परंतु भाषेचे हे सामर्थ्य तिला अनायासे प्राप्त होत नाही. शब्दांची टांकसाळ निर्माण करून पदनाम कोशासारखे कोश निर्माण होऊ शकतील; परंतु त्यामुळे ती भाषा खऱ्या अर्थाने सकस होऊ शकणार नाही. जीवनाच्या कक्षा जसजशा रुंदावत जातात तसतशी भाषेची प्रगती होत असते. हा विचार जर मान्य असेल तर येत्या पाच-दहा वर्षांच्या आत रसायनशास्त्रासारखा किंवा शरीरशास्त्रासारखा विषय मराठीतून किंवा अन्य कोणत्याही भाषेतून चांगल्या रीतीने शिकविता येईल, असे मला मुळीच वाटत नाही. शब्दाला शब्द निर्माण करून रसायनशास्त्राचे एखादे पाठ्यपुस्तक निर्माण करता येईल व त्याचा अभ्यास करून विद्यार्थी परीक्षेत चांगल्या रीतीने उत्तीर्णही होऊ शकेल. केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे एवढ्यावरच ज्ञानवृद्धीचे समाधान मिळवावयाचे असेल तर गोष्ट वेगळी. पण आपण ज्याला विषय समजावून घेणे म्हणतो तो असल्या भाषांतरित पाठ्यपुस्तकांनी समजावून घेता येणार नाही.

आज वैज्ञानिक प्रगतीने केवढा मोठा टप्पा गाठला आहे. प्रत्येक शास्त्रशाखेत

प्रत्यही नवनवे शोध लागत आहेत. दहा वर्षांपूर्वी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्यतेच्या कक्षेत येत आहेत. चंद्रावर माणूस पाठवता यावा यासाठी रशिया–अमेरिकेसारखी राष्ट्रे किती संशोधन करीत आहेत, केवढा पैसा खर्चित आहेत याची साधी आकडेवारी पाहिली तरीही आपली छाती दडपून जाते. या शास्त्रीय संशोधनाची आपल्याला ओळख करून घ्यावयाची असेल तर इंग्रजीचा हात धरल्याशिवाय अन्य मार्ग नाही. या क्षेत्रात केवळ इंग्रजी भाषाच पुढे आहे असे नाही. जर्मन, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश आदी भाषांनीही या क्षेत्रात प्रगतीचा बराच टप्पा गाठला आहे. परंतु ब्रिटिश राजवटीमुळे या प्रगत युरोपीय भाषांपैकी इंग्रजीशी आपला परिचय झाल्यामुळे येथे इंग्रजी अभिप्रेत आहे इतकेच.

## भाषा सामर्थ्य

'अंग्रेजी हटावो' या आंदोलनाला भावनात्मक आकर्षण मोठे आहे. या आंदोलनामागचा वैचारिक गुलामगिरी नष्ट करण्याचा विचारही स्वतंत्र राष्ट्राच्या स्वाभिमानी नागरिकाला मान्य होण्यासारखा आहे. परंतु पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करून त्यांचे जे जे काही आहे ते ते श्रेष्ठ मानणाऱ्या गुलामगिरीवर प्रहार करणे वेगळे आणि पाश्चात्त्यांनी जी अखंड ज्ञानोपासना चालविली आहे, तिच्याशी वैर पत्करणे वेगळे. आणि मला वाटते, त्रिगुण सेन यांच्या भाषाविषयक धोरणाबाबत मतभेद व्यक्त करताना छागला यांना हे वैरच अभिप्रेत आहे.

हा झाला भाषाविषयक प्रश्नाचा एक विचार. दुसरा एक विचारही तितकाच महत्त्वाचा आहे. युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षा मातृभाषेतून देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा की, वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळविण्यासाठी इंग्रजी न आले तरी आता चालता येण्यासारखे आहे. आपल्या देशात प्रमुख अशा पंधरा प्रादेशिक भाषा आहेत. प्रत्येक भाषिक गटाने आपापल्या मातृभाषेतूनच या परीक्षेला बसण्याचा विचार केला आणि या परीक्षेत प्रावीण्य संपादन केलें तर मराठी माध्यमातून ही परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार महाराष्ट्राबाहेर नोकरी करण्यास समर्थ होईल काय ? एकदा काही प्रवृत्ती जोपासली गेली की बंगालमध्ये केवळ बंगाली जाणणारा अधिकारी, आंध्रमध्ये केवळ तेलुगू जाणणारा अधिकारी, अशी जर परिस्थिती निर्माण झाली तर अखिल भारतीय एकात्मतेचे आज राजकीय कारणामुळे धूसर होत जाणारे चित्र भाषिक अभिनिवेशामुळे अधिकच फिकट होत जाणार आहे. मातृभाषेच्या अभिमानाचा रास्त अभिमान बाळगताना व तिच्या विकासासाठी जिद्दीने प्रयत्न करताना आपण एका खंडतुल्य देशाचे नागरिक आहोत आणि त्याबरोबरच विसाव्या शतकातील राजकीय प्रगतीचे पाथेय बरोबर घेऊन वाटचाल करणाऱ्या जगाचे घटक आहोत हे विसरून भागेल काय ? परवडेल काय ?

अखेरीस कोणत्याही भाषेला सामर्थ्य प्राप्त होते ते तिच्या सर्व क्षेत्रांत सामर्थ्य

संपादन करणाऱ्या तिच्या पुत्रांमुळे. आज जगात इंग्रजीचा वरचष्मा आहे याचे कारण एकेकाळी ही भाषा बोलणाऱ्यांचे जगाच्या फार मोठ्या भागावर स्वामित्व होते म्हणून. इंग्रजीपूर्वी हा मान फ्रेंच भाषेने मिळविला होता. परंतु नेपोलियननंतर फ्रेंच साम्राज्याला ओहोटी लागली आणि त्याबरोबरच फ्रेंच भाषेच्या फ्रान्सबाहेरील प्रभुत्वालाही. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रजीचीही हीच गत झाली असती. परंतु अमेरिकेसारख्या बलाढ्य सत्तेची ती भाषा असल्यामुळे तिचे वर्चस्व कायम टिकले. अमेरिकेचा आणि इंग्रजांचा अविक्षेप करण्यात धन्यता मानणाऱ्या द गॉलच्या फ्रान्सलाही आपल्या दुकानांमध्ये इंग्रजी जाणणारा नोकरवर्ग ठेवावा लागतो. तो डॉलर खिशांत खुळखुळवीत जगभर भ्रमंती करणाऱ्या इंग्रजी भाषिक पर्यटकांसाठीच.

## व्यावहारिक विचार

भाषा, हा काही प्रमाणात अभिमान विषय असला तरी मुख्यत्वेकरून दुसऱ्याचे विचार जाणून घेणे आणि आपले इतरांना समजावून सांगणे हे तिचे मुख्य कार्य आहे. या दृष्टीने मला गमतीचा प्रसंग आठवतो. इंग्रजी किंवा हिंदी भाषेचे ज्ञान नसणे हा काही गुन्हा नव्हे. परंतु त्याबरोबर हेही खरे आहे की कोणत्याही भारतीय नागरिकाला आपले विचार सर्व भारतीयांना कळावेत असे वाटत असले तर त्याला इंग्रजीचा किंवा हिंदीचाच आधार घ्यावा लागतो. परंतु या भाषाच्या आपल्या अज्ञानावर मायमराठीच्या स्वाभिमानाचा सोयीस्कर पडदा टाकण्यासाठी नव्यानेच लोकसभेवर निवडून आलेल्या एका महाराष्ट्री कार्यकर्त्याने ' मी दिल्लीत बोलेन तो ज्ञानेश्वर–शिवाजीच्या मराठीतच. ' शनिवार वाड्यासमोर टाळ्या घेणारे हे वाक्य आहे. परंतु या लोकप्रतिनिधीला आपल्या लोकांचे एकही गाऱ्हाणे लोकसभेमार्फत साऱ्या भारताला कळविता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. ज्या कार्यासाठी लोकांनी त्याला निवडून दिले होते तो ते कार्यच करू शकला नाही. बोलेन किंवा लिहीन तर मराठीतच ही भाषा एखाद्या राजवाड्यांच्या किंवा केळकरांच्या तोंडी शोभून दिसते. कारण तिथे अभिप्रेत आहे ती मायभाषेची कळकळ परकीय भाषेच्या अज्ञानापायी निर्माण होणारा तो दंभ नव्हे. परंतु नोकरीधंद्यासाठी अन्य भाषिकांशी संबंध येणाऱ्या सर्वसामान्य माणसाला शेजाऱ्याचे मनोगत जाणून घेता आले पाहिजे. आपले मनोगत त्याला समजावून देता आले पाहिजे. त्यासाठी आंतरराज्यीय व्यवहाराची भाषा व आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा आपल्याला समजली पाहिजे, त्या भाषेत लिहिता–बोलता आले पाहिजे. शुद्ध ज्ञानोपासना तर सोडाच पण हा साधासुधा व्यावहारिक विचारही ज्यांना मान्य नाही त्यांनी 'शिकेन तर ज्ञानेश्वर–शिवाजीच्या मराठीतच ' हा आग्रह धरावयास काहीच हरकत नाही. डॉ. त्रिगुण सेन यांच्या भाषाविषयक धोरणाला हेच अभिप्रेत असावे आणि म्हणूनच छागलांसारखा निस्पृह न्यायपंडित केंद्रीय मंत्रिमंडळातून बाहेर पडला आहे.

इंग्रजांचे म्हणून जे जे काही आहे तेच चांगले अन् म्हणून रक्षणीयही हा जसा

टोकाचा विचार झाला तसेच आपल्या प्राचीन संस्कृतीचे गोडवे गाण्याच्या उत्साहापायी इंग्रजांनी (पाश्चात्त्य या अर्थी) किंवा अचूक बोलावयाचे तर इंग्रजी राजवटीने आपल्याला ज्या काही देणग्या दिल्या त्या सर्वच्या सर्व तिरस्कारार्ह अन् म्हणूनच पश्चिम सागरात बुडविण्याच्या धमकीचा हा विचारही तितकाच एकांतिक अन् आत्मघातकी आहे. इंग्रजी राजवटीच्या निमित्ताने इंग्रजी भाषेशी–पर्यायाने आधुनिक ज्ञानाशी–आपली जी ओळख झाली आहे ती परतंत्र भारतापेक्षाही स्वतंत्र भारताला अधिक उपयोगी ठरणार आहे. एम. ए. पर्यंत मातृभाषेत अभ्यास करणारा विद्यार्थी अद्ययावत प्रगतीची ओळख करून घेण्यास पात्र ठरेल असे निदान मी तरी समजत नाही. शेवटी शिकावयाचे कशासाठी हा मूलभूत प्रश्न विचारला गेला तर आपले स्वतःचे आणि त्या बरोबरच आपल्या भोवतालचे वैचारिक जीवन संपन्न करण्यासाठीच हे उत्तर द्यावे लागते. आणि केवळ पाठ्यपुस्तके कंठगत करून त्या त्या विद्याशाखेच्या मुळापर्यंत जाण्याची प्रवृत्ति निर्माण होणे सर्वस्वी अशक्य आहे. युद्धशास्त्र, वैद्यकशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र आदी भौतिक शास्त्रांची गोष्ट तर सोडाच; पण अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या निकट वैचारिक शास्त्रांचा जरी विचार केला तरी मला असेच म्हणावेसे वाटते की आजचे प्रमुख राजकीय वा आर्थिक वा समाजशास्त्रीय विचार ज्या भाषेने वा भाषांनी निर्माण केले त्या भाषेतून वा भाषातून जाणून घेण्याचा प्रयत्न केला तरच त्यांचे रहस्य समजण्याची शक्यता आहे. गेल्या दहा–बारा वर्षांत मराठीमध्ये राज्यशास्त्रावर व अर्थशास्त्रावर डझनवारी पाठ्य–पुस्तके तयार होत आहेत. हे कार्यही कमी महत्त्वाचे आहे असे नव्हे. परंतु ज्या प्राध्यापकानी ही पुस्तके तयार केली (तयार केली हा शब्द हेतूतः वापरीत आहे.) त्यांनी त्या त्या शास्त्राचे इंग्रजी पाठ–पुस्तक डोळ्यांसमोर ठेवूनच ही ग्रंथरचना केली आहे ही वस्तुस्थितीही नाकारता येणार नाही. उदाहरण घ्यावयाचे तर राज्यशास्त्रात विवेचिल्या जाणाऱ्या ‘ लोकशाही ’ या कल्पनेचे घेता येईल. लोकशाहीची पाश्चात्त्यांची व्याख्या अनुवादित करण्यापलीकडे या पाठ्यपुस्तकात नवे काहीही आढळत नाही. या असंख्य प्राध्यापकांपैकी एकानेही (निदान जी पुस्तके माझ्या पाहण्यात आली ती लक्षात घेता) राज्यशास्त्रातील या प्राथमिक सिद्धांताने काहीसे मूलगामी व रूढ पाश्चात्त्य विचारसरणीपेक्षा निराळे आणि स्वतंत्र विवेचन केले आहे असे मला तरी आढळले नाही. इंग्रजी शब्दाऐवजी मराठी शब्द योजून एखाद्या विचाराचा ढोबळ आशय समजून येत असेल. परंतु त्या विचाराच्या सर्व सूक्ष्म छटांशी आपण अपरिचितच राहतो. आणि हे असे अपरिचित राहणे प्रतिदिनी अकल्पनीय वेगाने प्रगती करणाऱ्या विसाव्या शतकात वावरणाऱ्या समाजाला कितपत परवडण्यासारखे आहे हा खरा प्रश्न आहे.

**सदाशिव पेठकर**

# मु क्ता फ ळे

## □ लव्ह इन टोकियो

सरहद्दीवरचे राष्ट्र आपले शत्रू असेल, तर सरहद्दीवरच्या राष्ट्राच्या सरहद्दीवरील राष्ट्र आपले मित्र म्हणून राखावे असा उत्तम परराष्ट्रनीतीतील नियम कौटिल्याने व लेफ्ट. जनरल कौल यांनी सांगून ठेवला आहे. समजले ? समजा, एका चाळीत श्री. बावळट, श्री. वाघ व श्री. परिश्रमे असे तिघे राहत आहेत. तिघांच्या खोल्या याच अनुक्रमाने आहेत आणि श्री. बावळट यांच्या मुलांना श्री. वाघ यांच्या मुलीने थोबाडीत मारली ! तर अर्थात सौ. बावळट व सौ. वाघ यांची जंगी हमरीतुमरी होईलच, शिवाय श्री. व सौ. बावळट यांची चिरंजीव प्रजा व श्री. वाघ यांची कुमार मंडळी यांचेही सतत वेडावणे चालू राहणार. थोडक्यात श्री. बावळट यांचे कुटुंब व श्री. वाघ यांचे प्रजासत्ताक यांच्यांत दूधवाला, कोळसे-वाला, पेपरवाला जाईल पण 'विस्तव' जाणार नाही. अशा वेळी श्री. बावळट यांचे कर्तव्य काय ?

श्री. बावळट यांनी ताबडतोब हे हेरले पाहिजे की, जसे शेजारी श्री. वाघ यांचेशी आपले जमले नाही तसेच श्री. वाघ यांचे पलीकडील शेजारी श्री. परिश्रमे व श्री. वाघ यांचेही फारसे बरे नसावे. तेव्हा श्री. बावळट यांनी, आपल्या घरात होणारे भजी, पापड, बटाटेपोहे इ. पदार्थ अधूनमधून श्री. परिश्रमे यांना पाठवावे.

आपल्या शेजाऱ्यापेक्षा शेजाऱ्याचा शेजारी हा नेहमी कमी मुले असलेला व टामटुमीत राहणारा असतो ! तसे जर श्री. परिश्रमे असतील, तर त्यांच्याकडून श्री. बावळट यांना, अधूनमधून गुलाबजांब, श्रीखंड, बासुंदी असे पदार्थ येऊ लागतील. या पदार्थांनी भरलेल्या वाट्या नीट घासून स्वच्छ करून पाठवणेही श्री. बावळट यांना जमत नाही, हे श्री. परिश्रमे यांच्या लक्षात येईपर्यंत श्री. बावळट व श्री. परिश्रमे यांची मैत्री इतकी दृढ झालेली असेल, की आता या त्रासाचे श्री. परिश्रमे यांना काहीही वाटत नाहीसे होईल. समजले ?

उदाहरणाने मुद्दा थोडा विकटच झाला असेल, परंतु उदाहरणे देऊन आपले

सांगणे अधिकच गुंतागुंतीचे केल्याखेरीज म्हणण्याला जोर कसा येणार ? भारताचे उप-पंतप्रधान मोरारजी देसाई गेल्या १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर का नव्हते हे लक्षात येण्यासाठी हे सर्व सांगावे लागले. उप-पंतप्रधान झाल्यानंतर हा खरे पाहता त्यांचा पहिला १५ ऑगस्ट ! असे असून ते तिथे नव्हते; कारण ते टोकियोत होते. जपान देशात उप-पंतप्रधान ही जागा हवीच म्हणणारा कुणी नसल्याने, मोरारजी-भाईंचे सर्व म्हणणे हे जपानचे पंतप्रधान इसाकू साटो व परराष्ट्रमंत्री मिकी यांनाच ऐकावे लागले. यांच्याशी बोलताना ते सारखे सांगत होते–

" आशिया खंडात लाल चीनला पायबंद घालू शकेल असा एकच देश आहे तो म्हणजे भारत !"

आता गेल्या महायुद्धात एकाच वेळी अमेरिका, चीन व इंग्लंड या तिन्ही देशांना पळता भुई थोडी करणाऱ्या जपानला हे सांगायला धाष्टर्य केवढे हवे ? परंतु ' मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे ' असे रामदासांनी उगाच का म्हटले आहे ?

अर्थात इसाकू साटो जरा चमकले. त्यांना वाटले भारताने अॅटम बॉम्ब, क्षेपणास्त्रे वगैरे गुपचूप तयार केली की काय ? आडदांड मिकीचा तर अगदी ' माऊस ' झाला. त्यांनी भीतभीत विचारले–

" आपण म्हणता त्यात सत्य असणारच ! परंतु हे सगळे कसे काय ? तुमचा प्रदेश तर चीन दाबून बसलेला आहे !"

मोरारजीभाईंनी त्यांची ही आश्चर्यावस्था फार काळ टिकू दिली नाही. ते म्हणाले,

" देश सामर्थ्यवान व्हायला काय अणुबॉंब लागतो की काय ?"

जपानच्या टाळक्यावर अमेरिकेचे दोन अणुबॉम्ब पूर्वी पडलेले असल्याने, साटो-मिकी जरा कुतूहलाने ऐकू लागले. मोरारजी सांगत होते–

" शेवटी राष्ट्र लढते ते अणुबॉंबने नाही ! तर नेहमीची (Conventional) शस्त्रे वापरूनच आणि या शस्त्रानिशी आक्रमकाचा मुकाबला करायला भारत सिद्ध आहे !

आता पुरातन शस्त्रांनीच लढणारा हा महापुरुष, धनुष्यबाण किंवा तलवार न वापरता बंदुका, नॅपलॅम बॉम्ब हे तरी का वापरतो हे साटो-मिकी यांना खरे म्हणजे कळेना ! शिवाय गेल्या महायुद्धात केवळ अणुबॉम्ब जवळ नसल्याने अखेर मॅकऑर्थर आपल्या उरावर बसला, हे या जपानी नेत्यांना ठाऊक असताना, त्यांनीही मोरारजींचे ज्या अर्थी कौतुक केले, त्या अर्थी ' मुरारजीचे धारिष्टच ' जसे श्रेष्ठ तसेच इसाकू साटो यांचे सौजन्यही कमालीचे असे म्हटले पाहिजे.

"प्रेमाची ऐसी जाती । असे लाभावीण प्रीती ।।" म्हणूनच मोरारजीभाई म्हणाले– " मी केवळ जपानी लोकांच्या प्रेमाचा भुकेला आहे. मी नुसता भुकेला म्हणून आलेलो नाही. "

मोरारजींचे हे वाक्य आतल्या पानावर व पहिल्या पानावर—" जपानने भारताला देऊ केलेली कर्जे " असे छापणाऱ्या भारतीय वृत्तपत्रांनी जरा विवेक पाळायला हवा होता. प्रेमाची भूक पहिल्या पानावर व भुकेचे प्रेम आतल्या पानावर व्यक्त केले असते तर चालले नसते का ?

मोरारजी तरी किती ठिकाणी पाहणार ! इकडे भारताचे अन्नमंत्री जगजीवनराम अमेरिकेकडून गव्हाच्या बोटी अजून का येत नाहीत म्हणून हवालदील झालेले. दीड मिलियन टन...अबब...एवढ धान्य पाठवितो—पाठवतो म्हणणाऱ्या जॉन्सन साहेबांनी विलंब केलेला असताना, ' जेवण 'रामांना काही सुचत नव्हते. वस्तुतः अमेरिका हीच जग-जीवनराम असून आपण सगळे ' जेवणराम ' आहोत हे जॉन्सन साहेबांना कळायला हवे. अन्नमंत्री जगजीवनराम म्हणाले—

" आम्हांला अशी माहिती कळली आहे की, अन्नधान्य मदतीचा करार ज्यात सादर केलेला आहे, ती फाईल अध्यक्ष जॉन्सन यांच्या टेबलावर गेले तीन-चार आठवडे पडून आहे !"

अरेरे ! आमची फाईल बाजूस सारून जॉन्सन साहेब व्हिएटनाम व अमेरिकेत निर्माण होणारे ' काळूस्तान ' यासंबंधीच्या—फायलीवर जर आधी सह्या करत असतील तर या कृतघ्नपणाला काय म्हणावे ? इकडे आमची ' क्षणोक्षणी पडे, उठे परिबळे उडे बापडी ' अशी स्थिती आणि—जॉन्सन साहेबांची ही तिकडे अशी दप्तर-दिरंगाई !

दप्तर दिरंगाई काय सर्वच मंत्री करतात ! भुकेल्या सरकारी नोकरांना दोन वेळचे पुरेसे अन्न मिळावे, म्हणून काही ' अलाऊन्स ' द्यायचा असेल तर दप्तर-दिरंगाईचा उच्चांक होतो. परंतु जॉन्सनसाहेबांनी हे करणे याला काहीच अर्थ नाही. जगजीवनराम यांनी या अन्यायाला वाचा फोडली हे अगदी ऐन गोकुळअष्टमीला ' हंडी ' फोडावी तसे झाले.

कुमार भारत अत्यवस्थ असताना एक बाहुली आणि अनेक विदूषक, त्याला हुशारी वाटावी म्हणून प्रयत्न करीत आहेत. अखेर काय व्हायचे ते होईलच. परंतु ' अखेरपर्यंत हसत होता ' असे तर लोक म्हणतील ना ? सत्तेशी ' सायोणारा ' कुणाला चुकला आहे ! तूर्त ' लव्ह इन टोकियो ' याने पूर्वेकडील दौरा उरकून परत आलेल्या मोरारजींनी जी रुग्णसेवा केली आहे ती केवळ ' अपूर्व ' होय. त्यांच्या वाक्यावाक्याला जपानी जनतेने टाळ्या वाजवल्या. मंगेश पाडगावकरांनी म्हटलेच आहे—

टाळ्यांचा बेहोष गजर । स्वीकारताना शेवटी ।।
त्याने ढुंगण चाचपले । लागली त्याला शेपटी ।।

(विदूषक पृ. २८).

कर्जाची ही शेपटी हनुमंत पुच्छासारखी मोठी आहे, हे महत्त्वाचे नाही काय ?

## □ सांगलीत नाट्य महोत्सव !

येत्या जानेवारीत सांगली येथे काँग्रेसचे अधिवेशन भरणार आहे. महाराष्ट्र हा नहमी कसला तरी बालेकिल्ला असतो. असंख्य 'कायम बालशिवाजी' इथे असल्याने 'बालेकिल्ला' महाराष्ट्रातच असावा हा काही योगायोग नाही. अखिल भारतीय काँग्रेसचा महाराष्ट्र हाच आता एकमेव बालेकिल्ला काही फुटक्या बुरुजांसह परंतु ताठ उभा आहे.

या अधिवेशनाला कामराजजी, इंदिराजी, मोरारजी, यशवंतरावजी, जगजीवनरामजी इत्यादी थोर थोर नेते येणार आहेत. शिवाय डॉ. चंद्रशेखर, दिनेशसिंग, इ. नवी रत्नेही येणार आहेत. 'जी जी' करणाऱ्यांची तर झुंबड उडणार आहे.

काँग्रेसचे हे वैभव पाहून ज्यांना दुस्वास वाटतो, अशा भारतीय क्रांतिदलाचे नेते मालोजीराव निंबाळकर व बाबूराव नाईक यांनी त्याच दिवशी त्याच तारखांना सांगली येथेच 'काँग्रेस हटाओ' मेळावा भरवण्याचे ठरवले आहे. आता हे क्रांतिदल अखिल भारतीय नसल्यामुळे, जनसंघाचे बलराज मधोक, सं. स. पक्षाचे एस्. एम्. जोशी व डॉ. लोहिया, परजा समाजवादी पक्षाचे प्रेम भसीन व उजवे कम्युनिस्ट भाई डांगे हे सर्व या वेळी हजर राहणार आहेत.

आम्ही म्हणतो, खुश्शाल भरवा हा मेळावा. तुकारामबुवांनी म्हटलेच आहे की, "निंदकाचे घर असावे शेजारी." असे 'चले जाव' किंवा 'हटाओ' म्हणून सत्ताधीश सत्ता सोडतात होय ? आता काँग्रेसजनांनीदेखील परवा 'चलेजाव' चळवळीचा रजतमहोत्सव केला पण तो आपला एक समारंभाची पद्धत म्हणून...! या ४२ च्या आंदोलनाचे एक सेनापती अच्युतराव पटवर्धन यांनी सांगूनच टाकले–"४२ च्या चळवळीने ब्रिटिश गेले असे समजणे ही चूक आहे." 'चलेजाव' चळवळ मुख्यत: हिंदूंनी केली. मुसलमानांनी काहीही केले नाही. मग जिनांना कसे 'पाकिस्तान' मिळाले हो ? 'चलेजाव' चळवळीचा आपण वाटल्यास सुवर्ण महोत्सव, अमृत महोत्सव, शताब्दी याहूनही धडाक्याने करू. परंतु यावरून काँग्रेसचे निंदक जर असे समजणार असतील की 'काँग्रेस हटाओ' असा शंख करताच आम्ही जाऊ तर तो त्यांचा भ्रम आहे ! ब्रिटिशांचे पेकाट मोडायला हिटलर होता. आमचे पेकाट अजून शाबूत आहे. तुम्ही खुश्शाल बोंबला–'हटाओ–हटाओ !'

आता अगदी काँग्रेसचे अधिवेशन आहे त्याच दिवशी, त्याच घटकेला हे 'काँग्रेस हटाओ' चे पृथक पृथक शंखध्वनी अधिवेशन का बुवा ? कल्पना करू की त्याच घटकेला काँग्रेसने प्राण सोडला म्हणजे त्याच घटकेला यांचेही जीवितकार्य संपलेच की ! एवढ्या सगळ्या थोर थोर पक्षाचे सांगलीतच असे एकसमयावच्छेदेकरून बरेवाईट होणे हे सांगलीकरांना फार त्रासदायक ठरणार आहे.

काँग्रेसच्या पंक्तीत आडवे पाट मांडले म्हणून डोक्यात राख घातलेल्या, कुणा मालोजीराव आणि बाबूरावांना नादी लावून 'हटाओ' चा रासभध्वनी करणाऱ्या

अखिल भारतीय पक्षांची आम्ही तरी कीवच करू. 'बैठो' म्हणताच कुणी बसू नये. 'हटाओ' म्हणताच कुणी उठू नये! मतदारांची 'नाटकशाळा' असले तमाशे करून का वश होणार आहे? महाराष्ट्रात तरी तिचे आमचे पूर्वीच 'जमले' आहे.

## □ चौथे बाळंतपण

केंद्रीय अर्थखात्याने एक परिपत्रक काढले असून त्यात औद्योगिक कामगार नसलेल्या नोकरीतील स्त्रीला—म्हणजे मध्यमवर्गीय कारकून स्त्रीला—१ एप्रिल १९६६ पासून चौथ्या बाळंतपणासाठी बाळंतपणाची रजा मिळणार नाही, अशी ताकीद दिली आहे. या परिपत्रकाची तरफदारी करण्याकरिता एक केंद्रीय उपमंत्री बी. एम्. मूर्ती हे राज्यसभेत बोलू लागले तोच काँग्रेस पार्लमेंटरी पक्षाचे एक चिटणीस चंद्रशेखर (हे डॉ. चंद्रशेखर नव्हेत हो!) ओरडून म्हणाले—

"ही आचरट आणि मूर्ख आज्ञा मागे घेण्यात यावी."

काय हे बेशिस्त बोलणे! आज्ञा काँग्रेस सरकारची आणि ती आचरट आणि मूर्ख असल्याचे एका काँग्रेस सभासदानेच म्हणावे हा गाढवपणा नाही काय? जरा सौम्य भाषेत या आज्ञेचे वर्णन करता आले नसते का? ही आज्ञा आचरट आहे, असे आम्हांस वाटत नाही. बाळंतपणाची रजा मिळते म्हणून जर अधिक बाळंतपणे होत असतील तर रजा काढून घतल्यावर बाळंतपणे रद्द होणार हे उघड आहे! नोकरी करणाऱ्या स्त्रिया या बहुसंख्य मध्यमवर्गीय हिंदू स्त्रिया आहेत. त्यांच्या नवऱ्यांना एकच बायको असल्याने चौथे बाळंतपण त्यांच्यावर कोसळतेच. आता काय होईल? समजा, एखाद्या स्त्रीला चौथे बाळंतपण टाळता आले नाही तर तिला बाळंतपणाची रजा काही मिळणार नाही. म्हणजे एक दिवशी ऑफिसातच ती ×× ! एकदा अशी फटफजिती झाली की राजीनामा न देऊन मग सांगते कुणाला? इंदिरा गांधी पंतप्रधान असताना ही आज्ञा निघाली हे ठीक झाले. नाहीतर "या देशात आया बहिणींना अब्रूने जगणे या काँग्रेस—कौरवांनी अशक्य केले आहे," असादेखील ओरडा विरोधी पक्षाने केला असता. राजनारायण हे संसोपा सदस्य तरी म्हणालेच—

"ज्या मंत्र्यांना चार मुले आहेत त्यांनी प्रथम राजीनामा द्यावा!"

हे हो काय बोलणे!

"बाळंतपणाची रजा मंत्री घेत नाहीत." असे झक्क उत्तर उपमंत्री मूर्ती यांनी दिले. आता मुले कमी व्हावी यासाठी जर हे सर्व प्रयत्न असतील तर बाळंतपणाची रजा मागितली नाही म्हणून मंत्रीण बाईंना हवी तेवढी मुले होऊन कसे चालेल! असा प्रश्न आमच्या मनात आला. पण ते काही असले तरी मंत्र्याचा संसार आणि सामान्य हिंदु मध्यमवर्गीय स्त्रीचा संसार हा एकाच मापाने मोजणे गैर नाही का? लोकांना चार मुले होता कामा नयेत, कारण मंत्र्यांना सात-आठ होणार आहेत!

—ग्यानबा

●

# समीर विचार वारे

## □ अमेरिकेतील भारतीय, भारतातील अमेरिकन

भारतात राहणारे अमेरिकन भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला सुरुंग लावीत आहेत, या आरोपाचे खंडन करण्यासाठी श्री. कंस्टर बागुल्स यांनी ' अमेरिकन रिपोर्टर ' या अमेरिकन दूतावासाच्या मुखपत्रात नुकताच एक लेख लिहिला, त्यात म्हटले की परदेशीयांनी अमेरिकेत येऊन राहणे अमेरिकेला घातक आहे ही काही अमेरिकनांची भावना जेवढी चुकीची व घातक आहे तेवढीच काही भारतीयांची ही कल्पनाही आहे, व ती एकोणिसाव्या शतकात शोभण्यासारखी आहे. सध्या सुमारे ५०,००० भारतीय स्त्री-पुरुष अमेरिकेत राहत असून त्यांतले काही विद्यार्थी आहेत, काही नोकरी-व्यवसाय करीत आहेत, तर काही स्थायिक झाले आहेत. यांतले बरेच जण अमेरिकन नागरिक झाले आहेत किंवा होण्याच्या विचारात आहेत. त्यांत हजारो डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक आहेत, तर कॅलिफोर्नियात बरेचसे शीख शेतकरी आहेत. तात्पुरत्या राहणाऱ्या भारतीय मंडळींत सुमारे साडेसात हजार विद्यार्थी असून त्यांतले बहुतेकजण उच्च अभ्यासासाठी गेलेले आहेत. अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येच्या बाबतीत कानडाच्या खालोखाल भारताचा नंबर लागतो.

उलट हिंदुस्थानात ८,००० हून अधिक अमेरिकन स्त्री-पुरुष आहेत त्यांत सुमारे २,००० अमेरिकन सरकारचे नोकर व त्यांचे कुटुंबीय आहेत. १,२०० पीस कोअरचे स्वयंसेवक आहेत. अभ्यास-व्यवसाय करणारे सुमारे ३,०२० अमेरिकन व त्यांचे कुटुंबीय स्थायिक झाल्यासारखेच आहेत. सुमारे २०० प्राध्यापक व ४० विद्यार्थी आहेत. शिवाय सुमारे २,६०० मिशनरी व त्यांचे कुटुंबीय आहेत ते निराळेच.

दोन्ही बाजूंची ही आकडेवारी विचार करायला लावणारी आहे.

## □ व्हिएटनामचे बौद्ध राजकारण

व्हिएटनाममधील युद्धामुळे त्या देशाबद्दल जाणून घेण्याची सर्वांस उत्सुकता आहे, पण तेथे जाऊन माहिती मिळविणे फारच थोड्यांना शक्य असल्याने तेथील माहिती जगाला देण्यासाठी थिच डुक एन्‌घिएच हे प्रमुख दक्षिण व्हिएटनामी भिक्षू सर्वत्र हिंडत हिंडत नुकतेच भारतात येऊन गेले तेव्हा त्यांनी तेथल्या परि-

स्थितीची काही माहिती दिली. दक्षिण व्हिएटनाममधील अधिकाधिक तरुण बौद्ध भिक्षु-भिक्षुणी राजकारण खेळणाऱ्या बौद्ध नेत्यांच्या हातातले खेळणे बनत आहेत. तेथील बौद्ध भिक्षूंच्या एकूण संख्येपैकी पाच टक्क्यांहून अधिक भिक्षू सध्या राजकीय चळवळीत गुंतले आहेत. आतापर्यंत काही भिक्षूंनी अग्नीत आत्मार्पण करण्याचे जे प्रकार झाले. ते राजकीय आकांक्षा बाळगणाऱ्या धार्मिक नेत्यांनी प्रोत्साहन दिल्यामुळे झाले. पक्षपाताचा विरोध करण्याच्या नावाखाली हे अग्निदिव्य करण्यास भिक्षूंना चिथावण्यात आले. मात्र आता अशा प्रकारे आत्माहुती देण्याचे कारण उरलेले नाही.

व्हिएटनामी दक्षिणेचा असो, की उत्तरेचा त्याला फक्त शेती करण्यासाठी जमिनीचा तुकडा, पूजा करण्यासाठी वेदी आणि सुरक्षिततेची भावना या साऱ्या गोष्टी हव्या आहेत. शांतता ही महत्त्वाची आहे, पण तिच्यासाठी वाटेल ती किंमत देता येणार नाही. सायगाव आणि हॅनोई यांच्यात प्रत्यक्ष वाटाघाटी होऊ शकल्या तर परिस्थिती सुधारण्यास मदत होईल; परंतु व्हिएटनाम युद्धाच्या समस्येचे आंतरराष्ट्रीय उत्तर सापडल्याशिवाय हे युद्ध थांबणार नाही.


## ☐ सुशिक्षित बेकारांची समस्या

सुशिक्षित बेकारांची समस्या भारतात दिवसेंदिवस वाढत आहे व अनेक भारतीय विचारवंतांनी या प्रश्नावर आपले विचार मांडले आहेत. पण परकीय दृष्टीतून ही समस्या कशी दिसते हे पाहण्यासाठी लंडन विश्वविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. ब्लॉग दोन सहकाऱ्यांसह भारतात आले आहेत. "ही समस्या काही इतर प्रगतिशील देशांत आताच निर्माण झाली आहे, व इतर काही देशांत लवकरच निर्माण होणार आहे. तेव्हा भारतात आम्ही तिचे नीट अध्ययन करून तिच्यावर तोडगा काढू शकलो तर इतर देशांत तिचा प्रादुर्भाव आम्हांला टाळता येईल." ही समस्या अर्थशास्त्राचा एक अगदी नवीन भाग आहे. हा सबंध विषय केवळ दहा वर्षांपूर्वीच पुढे आला आहे.

सुशिक्षित बेकारांची समस्या केवळ व्यावसायिक शिक्षणावर भर दिल्याने सुटण्यासारखी नाही. प्रगतिमान अर्थकारणात दर थोड्या वर्षांनी नवीन गोष्टींचा उदय होत असतो, त्यामुळे लोकांना विशिष्ट व्यवसायाचेच फक्त शिक्षण दिले तर पुढे ते इतर कामे करू शकणार नाहीत व त्यामुळ नवीन समस्या निर्माण होतील. ही जटिल समस्या सोडविण्याचा मार्ग म्हणजे उच्च शिक्षणाच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवणे. "भारतात उच्च शिक्षणाच्या प्रसारावर नीट नियंत्रण असायला हवे."

## रातराणी

# सर पॉल म्युनी



पॉल म्युनी गेले. ही बातमी माझ्या वाचनात येईतो या घटनेवर काही काळ उलटला आहे. या बातमीवरचा मजकूर प्रसिद्ध होईतो आणखी काळ उलटून जाणार आहे. या बातमीचे नुसते शीर्षक वाचून मी उद्गारलो, काय म्युनी गेले ? माझ्या समोर काही कामानिमित्ताने भल्या सकाळी येऊन बसलेल्या पंचविशीतल्या तरुण मुलाने माझ्या या उद्गारातला विस्मय आणि विषाद जाणवून की काय, गंभीरपणे विचारले, कोण म्हणालात ? कोण म्युनी ?

त्या मनःस्थितीत या त्याच्या अज्ञानाचा मला राग आला. हा तर चित्रपटांचा त्यातही इंग्रजी चित्रपटांचा शौकीन पोरगा. कालपरवाच्या आणि आजच्या एकूण एक नट-नटींची नामावली

विजय तेंडुलकर

# झळाळणारे व्यक्तिमत्व

आणि कर्तृत्वे त्याला पाठ. एल्व्हिस प्रेस्ले, एलिझाबेथ टेलर, पीटर ओतूल, नॉर्मन विज्डम, सायरा बानू, धर्मेंद्र, एक ना अनेक. याला पॉल म्युनी माहीतच नाहीत? पण खरेच त्याला माहीत नव्हते. मी मग सांगितले, त्यातला एकही चित्रपट त्याच्या पाहण्यात नव्हता. पैकी एकाविषयी त्याने कोठे तरी वाचले की ऐकले होते. माझ्या समाधानासाठी तो म्हणाला, हो हो, ते होय. मग त्यानेही जरा दुःखी चेहरा केला, पण त्याला काहीच वाटलेले नव्हते.

पॉल म्युनी गेले म्हणजे केवळ एकच व्यक्ती गेली, हे खरे नव्हेच. मी त्याला या निमित्ताने कोण कोण आणि किती किती गेले ते कसे समजावणार होतो? पॉल म्युनी गेले म्हणजे आपल्या लेखनासाठी एकांत शोधीत भलत्याच एका ड्रायफस नामक लष्करी अधिकाऱ्याच्या नाहक बडतर्फीच्या प्रकरणात अनिच्छेने ओढले जाऊन अखेर न्यायालयात सत्यासाठी सर्वस्व आणि जीवित पणाला लावून त्वेषाने लढलेले फ्रान्सचे प्रसिद्ध



# मेक्सिकोचा क्रांतिवीर वारेझ गेला

एमिल झोला गेले. एका कोवळच्या, गरीब मुलासाठी कुत्र्याच्या विषाचा महान् शोध लावणारा निश्चयी, बुद्धिनिष्ठ संशोधक लुई पाश्चर गेला. आपल्या उपायानेच जीवदान लाभून बरे झालेल्या त्या मुलाला निरोप देताना परत बोलावून त्याला डोळाभर न्याहाळीत ' मोठा हो हं ' म्हणून सांगणारा तो रुपेरी पडद्यावरचा आभाळाएवढा मोठा आणि तेवढाच निरपेक्ष माणूस अजून काल-परवा भेटलेला असावा तितका स्मृतीत ताजा आहे. ' गुड अर्थ ' मधला या दोघांच्या अगदी उलट असा सर्वसामान्य, कष्टाळू, चिवट वाँग त्याच्या लांब शेंडीसकट आणि मितभाषी कणखर वृत्तीसकट आठवतो आहे. आपण बाप झालो हे कळल्यावरचा त्या रांगड्या जीवाचा बालसदृश उत्सव, त्याचे हसणे, आपल्या पोराकडे पाहताना त्याच्या नजरेत चमकलेले सार्थक, या क्षणी स्मृतीत दरवळते आहे. आणि तो मेक्सिकन स्वातंत्र्यवीर वारेझ ! दगडी चेहऱ्याच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या या फत्तरातून, झऱ्यासारखी सतत वाहणारी मेक्सिकोच्या स्वातंत्र्याविषयीची आणि तेथल्या भोळ्या, कंगाल, दलित समाजाविषयीची अपार तळमळ ! एक महत्त्वाची गुप्त खबर प्राणाच्या बाजीने घेऊन आलेला मेक्सिकन तरुण शेतकरी पोर खबर पोचवून वारेझच्या पायोंशीच कोसळून गतप्राण होतो तेव्हा वारेझचा तो दगडी निश्चल चेहरा जे आणि जेवढे बोलला ना, तेवढे कुणी नाही बोलू शकणार ! कुणीच नाही ! आज शीर्षक न आठवणाऱ्या (बहुधा ' काउंटर अॅटॅक ') एका चित्रपटात म्युनींनी एका भित्र्या, कचखाऊ रशियन सैनिकाचे, काम केले होते. त्याच्या हाती बरेच जर्मन कैदी आणि तो एकटा, ते हुशार तो थकला मरगळलेला. ते सावध, याच्या डोळ्यावर निद्रेची येऊ पाहणारी अनावर झापड. शिवाय काळीज कच खाण्याचीच आदत असलेले. या मानवी लांडग्यांना कुणास ठाऊक किती काळ असे एकट्याने काबूत ठेवावे लागणार ! पण दुसरे गत्यंतर नाही. सामना त्यांच्याशी आहे तसा स्वत:च्या वृत्तीशी आणि अवस्थेशीही आहे. म्युनींच्या या बुझदिल माणसातून या अपरिहार्य कोंडीत प्रथमच उचंबळलेले अपूर्व शौर्य-धैर्य आणि सावधचित्तता क्षणोक्षणी उत्कंठेचा इतका पीळ भरणारी आणि त्याच वेळी इतकी हरखून टाकणारी होती, म्हणता ! तो चित्रपट सामान्य असूनही त्यातला तो रशियन सैनिक अविस्मरणीय ठरला. त्यात मुळी आम्ही स्वत:लाच पाहिले.

ज्या वयात हे सारे पाहिले ते वय काही साक्षेपी व्यासंगाचे नव्हते, उलट यासाठी

# फ्रान्सचा एमिल झोला गेला

कित्येकदा शाळेला बुट्ट्या माराव्या लागल्या आणि पुस्तके दडवीत सिनेमाथेटराच्या पहिल्या रांगेतल्या, ढेकणांनी बुजबुजलेल्या बाकड्यावर जाऊन बसावे लागले. इंग्रजीचे ज्ञानही तसे माफकच होते, जगाचे नि जीवनाचे ज्ञान तर विचारू नये. पण या साऱ्यापलीकडे म्युनी ' सरां 'नी त्यांच्या ' शाळे 'त आम्हांला घटका-घटका नेले, बेभान बेहोष केले, आमच्यावर अव्वल अभिनयाचे, अव्वल माणुसकीचे उदात्ततेचे आणि सामर्थ्याचे संस्कार केले. शाळेत आम्हाला मिळाले नाही ते या अभिनयशाळेत मिळाले. झोलाचे न्यायालयातले दीर्घ भाषण अद्याप मला त्यातल्या लकबींसकट मुखोद्गत आहे. ते मनोमन या क्षणी म्हणताना काळीज कसे उचंबळत आणि त्याच वेळी गलबलत आहे. म्युनी गेले म्हणजे क्षणभर हे सारे सारे गेल्यासारखे वाटले. चित्रपटातले, एमिल झोला निवर्तल्याची वार्ता प्रसिद्ध होते तेव्हा त्या धक्क्याने पॅरिस हादरते ते प्रसंग नजरेसमोर तरळले.

तसे त्या काळात इंग्रजी चित्रपटांतून उत्तमोत्तम नटनटी काही थोडे झाले नाहीत. ' यंग मिस्टर पिट ' आणि ' गुडबाय मिस्टर चिप्स ' वाले रॉबर्ट डोनॅट होते, छकडा रॉबर्ट टेलर होता, रोनाल्ड कोलमन होते, पुरुषोत्तम वाटणारे गॅरी कूपर आणि क्लार्क गेबल होते. ' गॅसलाइट ' मधले चार्ल्स बॉये होते, ग्रेटा गार्बो होती, लॅना टर्नर होती, ग्रीअर गार्सन होती, ग्रेगरी पेक नव्यानेच पडद्यावर आला होता, त्याच्या जोडीने ती इंग्रिड बर्गमनदेखील गाजत होती; आणि या सर्वांवर आपल्या व्यक्तिमत्त्वाने आणि अभिनयसामर्थ्याने ताडमाड उंच झुलणारे स्पेन्सर ट्रेसी आणि चार्ल्स लॉटन तर अगदी ऐन ' फॉर्मा 'त होते. या सर्वांनी त्या काळात पुण्यातल्या एका सिनेमाथेटरात आडवेळेच्या खेळांना अगदी आमच्या पुढ्यात उपस्थित होऊन, त्यांना न्याहळताना भारावलेल्या, अवघडलेल्या, दुखलेल्या आमच्या मानादेखील आम्हाला जाणवू नयेत इतकी अपार सुखे आणि तृप्तीचे क्षण आम्हाला दिले. अशा तेजस्वी रत्नांच्या खचात पॉल म्युनी केवळ चमकले एवढेच नव्हे तर आपल्या वेगळ्या स्थानावरून आमच्यासमोर झळाळत राहिले.

खरे म्हणजे त्यांच्या अखेरीची वार्ता घेऊन आलेल्या वृत्तपत्रातले त्यांचे स्वतःचे छायाचित्र मला फार फार अपरिचित आणि परके भासले. पॉल म्युनींना आमच्या लेखी एकच असा चेहराच नव्हता. अनेक भूमिकांतून अनेक चेहरे आणि लकबी घेऊन पडद्यावर आलेले पॉल म्युनी या अनेक चेहऱ्यांतून आणि लकबींतून आमच्या-समोर जगले, वावरले, बोलले. यात त्यांचा स्वतःचा चेहरा मुळी आम्हाला पाहावा

महान् संशोधक लुई पाश्चर गेला

असे कधी वाटलेच नाही. किंबहुना त्यांचा स्वत:चाच स्वतंत्र असा वैशिष्टचपूर्ण चेहरा नव्हताच. कुठलीही असामान्य-सामान्य वैशिष्टचे हा चेहरा परिश्रमपूर्वक, रंगभूषेच्या कसबी वापराने आपलीशी करून एक वेगळा वैशिष्टचपूर्ण चेहरा होऊ शके. कधी झोलाइतका प्रगल्भ, तर कधी वाँगइतका रांगडा. कधी वारेझसारखा दगडी, भावहीन, तर कधी तितकाच हलता, भावपूर्ण. म्युनींचे अवघे व्यक्तिमत्त्वच जणू पाण्याच्या धर्माचे होते. त्यात सोडावे ते रंग ते पाहता पाहता आत्मसात करून चैतन्यमय होत असे.

असा आपल्याकडचा चेहरा एकच : नकलाकार कै. भोंडे यांचा. म्युनींइतके भावपूर्ण, बोलके डोळे असलेला आपल्याकडचा नट एकच : राजा परांजपे. म्युनींच्या चिकाटीने आणि ताकदीने एखादे लोकोत्तर व्यक्तिमत्त्व लोकोत्तरतेच्या पातळीवर सतत एक संपूर्ण चित्रपटभर पेलणारा मात्र आपल्या येथला एकही नट आठवत नाही. म्युनींचा झोला किंवा वारेझ किंवा पाश्चर केवळ भाषणांपुरता, पराक्रमी कृत्यापुरता किंवा लौकिकापुरताच लोकोत्तर नसे तर त्याच्या साध्या साध्या दैनंदिन गोष्टीत, गृहजीवनात, आविर्भावात, अगदी श्वासोच्छ्वासात तो लोकोत्तर वाटत असे; आणि तरीही त्यातला हाडामांसाचा माणूस आपल्याला सतत्याने प्रतीत होत असे. एवढ्यापुरते म्युनी अजोड होते आणि राहिले.

आता काळ बदलला. इंग्रजी चित्रपट अधिक रंजनप्रधान, रंगीत, भव्य, दिपवून टाकणारे बनले.

म्युनींच्या काळात चित्रपट करीत ते निखळ माणुसकीचे, सत्यनिष्ठेचे, स्वातंत्र्य-प्रेमाचे, उदात्ततेचे संस्कार आताच्या इंग्रजी चित्रपटांत चुकूनही सापडण्याची आशा नको. त्यात एक तर प्रखर वास्तव, भग्न जीवन नाहीतर, रंगीत संगीत रहस्यप्रधान रंजन यांचा पगडा फार आला आहे. आता म्युनी नाहीत, स्पेन्सर ट्रेसी नाहीत, लॉटन नाहीत, गार्बो-लॅना टर्नर, ग्रीअर गार्सन कुणास ठाऊक, आहेत का नाहीत. आणि कुठे आहेत. बेटी डेव्हिस तेवढी भयपटातून जख्ख म्हातारी म्हणून दिसते.

तरीही आवडीने मी इंग्रजी चित्रपट पाहतो. त्याचे वेगळे सौंदर्य आणि सामर्थ्य त्यांना आहे. मातबर नट-नटींनाही तोटा नाही. या सगळ्यात एक तृप्ती उपभोग-तानाही दोन उणीवा काळजात ठुसठुसत राहतात. राहणार. एक : दोस्त लॉरेल-हार्डी गेले. यांनी आम्हाला निखळ आणि पोटभर हसवले. दोन : पॉल म्युनी 'सर' आता नाहीत. यांनी जीवनसंग्रामात माणसाची कुळी लावणाऱ्याने जगावे कसे आणि मरावे कसे त्याची फार फार मोलाची शिकवण आम्हाला दिली. ☐



राम मराठे – आशा पोतदार

# मेलो–म्युझिक मेघमल्हार

नाटकांचे तीन प्रकार. कलात्मकतेचे नाहीतर प्रयोगशीलतेचे बिरुद आतबट्ट्यात मिरवणारी, कलात्मकता न सोडता गल्ल्याची जराशा संकोचानेच अपेक्षा ठेवणारी; आणि निःसंकोचपणे इतकेच नव्हे तर अभिमानाने आणि ताठ्याने गल्लाभरू हे लेबल मिरवणारी. यात उजवे डावे करण्याच्या भानगडीत न पडता यांपैकी तिसऱ्या वर्गातले उदाहरण द्यायचे तर 'नाट्य–मंदिर' संस्थेचे 'मेघमल्हार' हे अगदी ताजे आणि चालू उदाहरण मुंबई – पुण्यात सध्या उपलब्ध आहे.

जे जे प्रेक्षकाला हवे ते सर्व किंवा त्यातले बहुतेक अशा नाटकात असावे

# राम मराठे यांची आक्रमक तानबाजी

लागते. आता प्रेक्षकाला काय हवे त्याचे काही साचे नेहमीच धंदेवाईकाकडे तयार असतात. यशस्वी धंदेवाईकांचा स्वत:चाच एक हातखंडा साचा असतो. 'पंडितराज जगन्नाथ' या ऐतिहासिक नाटकाच्या निमित्ताने नाटककार विद्याधर गोखले यांना असा एक स्वत:चा संगीत साचा काही वर्षांमागे गवसला. मग त्यात कमजास्त सरमिसळ करीत त्यांनी पौराणिक 'सुवर्णतुला', काल्पनिक 'मंदारमाला', पौराणिक 'जय जय गौरी शंकर' आणि हे ताजे सामाजिक 'मेघमल्हार' अशी पुढली यशस्वी किंवा गल्लाभरू नाटके लिहिली. नवी संगीत नाटके म्हणून ती ओळखली जातात.

संगीत हे या नाटकांचे फार महत्त्वाचे आकर्षण असते. इतके की संगीतासाठीच ही सोयीने घडवली जातात. मग दोन-तीन संगीत नट त्यात आलेच. आता हे जे कोणी असतील (अवघ्या मराठी नाट्यसृष्टीत हाताच्या बोटांवर मोजावेत एवढेच ते आहेत.) त्यांच्या अभिनयाच्या वकूबाला पेलतील एवढ्याच ताकदीच्या भूमिका अशा नाटकांत त्यांच्यासाठी लिहिण्यात येतात. काही वेळा हा वकूब फारच प्राथमिक स्वरूपाचा किंवा त्याहून उणा असतो. मग या मंडळींसाठी एवढ्याच ताकदीच्या सांकेतिक, ढोबळ, शब्दबंबाळ आणि बव्हंशी अभिनयशून्य संगीत भूमिका लिहिणे आलेच. आणि पर्यायाने तेवढे सोपे कथानकही निवडले जाते. यात अभिनयाची जबाबदारी—असल्यास—दुय्यम व विनोदी नटांवर थोडीबहुत असते आणि संगीत प्रमुख नट गातात.

या संगीताचे – मराठी संगीत नाटकातील संगीताचे – एक असे अवघड झाले आहे की, त्याची एक चौकट फार मागेच तयार होऊन बसली आहे आणि या चौकटीत जे जे काही हरहुन्नरी प्रकार करता येतील तेही मागेच – संगीत नाटकांच्या जुन्या जमान्यात – बहुतेक सर्व होऊन चुकले आहेत. ही जुनी संगीत नाटकेही अगदी अलीकडील काळापर्यंत पुष्कळजणांनी पुष्कळ ठिकाणी पुष्कळदा केली. त्यातले संगीत सर्वतोमुखी झाले. अजूनही त्यातले एखादे नाटक मधूनच केले जाते. तेव्हा, नव्या संगीत नाटकाला नव्याने करण्यासारखे नाट्यसंगीताच्या रूढ मराठी चौकटीत फार कमी राहिले आहे. पुन्हा ही चौकट मोडणे प्रेक्षकाला रुचण्याचा संभव कमी मानला जातो. म्हणून या नव्या संगीत नाटकातील संगीताचा बाज एकीकडे ही चौकट सांभाळून काही तरी थोडेफार, बरेवाईट पण नवे करण्याचा असतो. मग कधी 'शास्त्रोक्त' व 'लाइट' ऊर्फ हलक्या फुलक्या संगीताच्या

# वसंतराव देशपांडे यांची प्रसन्नशैली

जोडीला आजकाल लोकमान्यता पावलेली संगीत जुगलबंदी दिली जाते तर कधी या जुगलबंदीतही संगीत विरुद्ध नृत्य असा एक सामना कल्पिला जातो. केव्हा स्वतंत्रपणेच संगीताखालोखाल नृत्यालाही वाव ठेवण्यात येतो. कथासूत्र अर्थात या गरजेनुसार कल्पिले, ताणले, तोडले, जोडले जाते. कथेला उपकथा येते किंवा उपकथा महत्त्व पावून मुख्य कथेला दुय्यम दर्जा मिळतो. या प्रकाराची जाणून-बुजून कामचलाऊ कथारचना आणि व्यक्तिरेखन यामुळे एकीकडे हे नाटक सैल, तुटक, पसरट, वटवटीत आणि फार सांकेतिक होते. हा डावेपणा भरून काढण्या-साठी येतो किंवा आणावा लागतो. भरपूर काव्यशास्त्रविनोद, नेपथ्यासारख्या आणि ट्रिकसीनसारख्या तांत्रिक किंवा घटनात्मक चमत्कृती आणि एवढयानेही भागत नाही असे वाटल्यास कथासूत्राच्या काळाचा विचार बाजूस ठेवून विद्यमान व्यक्तींवर आणि परिस्थितीवरही राजकीय, साहित्यिक, सामाजिक शेरे आणि ताशेरे योजावे लागतात. यात विद्यमान व्यक्तींची विडंबने येतात.

गोखल्यांचा ताजा ' मेघमल्हार ' या सर्व मालमसाल्याने परिपूर्ण आहे. या नव्या संगीत नाटकात पहिला अंक नाटककाराचा आणि दिग्दर्शकाचा, दुसरा नाटक-काराचा आणि संगीतनृत्यकारांचा आणि तिसरा केवळ संगीत नटांचा आहे. जुन्या संगीत नाटकांत, नाटक आणि संगीत यांची अशी सरळ सरळ वाटणी होत नसे. नावाला का होईना, ही दोन्ही खेळीमेळीने आणि एकत्र नांदत. प्रस्तुत नव्या संगीत नाटकाच्या पठडीत मात्र लिखित नाटकातून एक नृत्यसंगीताचा बहुढंगी कार्यक्रम व या कार्यक्रमाचे सूत्र पकडून सरतेशेवटी शास्त्रोक्त संगीताची मैफल उभी राहते आणि मैफलीतली भैरवी अधेमधे काही समारोपात्मक गद्य संवाद घेऊन म्हटली जाते. या गरजांनुरूप एका ध्येयवादी गवयाचे कथासूत्र गोखल्यांनी नाटकासाठी कल्पिले आहे आणि हा ध्येयवादी गवई, अभिनय गुणात राम मराठे यांच्या तोलामोलाचा आहे हे लक्षात ठेवून या कथासूत्राचा ढोबळ, सांकेतिक घटनांनी आणि भाववाही होण्याचा चुकूनही प्रयत्न न करणाऱ्या बव्हंशी वर्णना-त्मक, जोरदार, चुरचुरीत, अद्ययावत संदर्भाच्या संवादांनी त्यांनी जास्तीत जास्त विकास, संगीताला शक्य तेवढया ' जागा ' किंवा निमित्ते पुरवीत, केला आहे.

संगीत-भूषण राम मराठे यांच्या संगीत साथीला वसंतराव देशपांडे आणि शारदा घुळेकर या नाटकात आहेत. नृत्याची बाजू आशा पोतदार व चंद्रकांत हडकर यांच्याकडे आहे. विनोद मुख्यत: पंढरीनाथ बेर्डे सांभाळतात. वसंतराव

## बाकी या नाटकात जाणवते फक्त संगीत दिग्दर्शनच

देशपांडे त्यांना मिष्किल जोड देतात. शारदा धुळेकरदेखील यात अधून मधून आपल्या तऱ्हेवाईक चालण्या-बोलण्याने सामील होतात.

संगीतापुरते म्हणायचे तर वसंतराव देशपांडे या नाटकात, नाटकातले म्हणावे असे संगीत, आपल्या दुय्यम भूमिकेत असलेला माफक वाव पत्करून, मर्यादेने परंतु प्रसन्न शैलीने गातात.

राम मराठे या नाटकात मैफीलीचे वाटणारे संगीत गातात. मैफलीप्रमाणेच हे ऐसपैस आणि मागले पुढले मान न ठेवता चाललेले भासते. परंतु या संगीताचा एक तिसराच बाज आहे. मैफीलीचे ऐसपैस वजन आणि नाट्यसंगीताची आक्रमक तानबाजी या दोहोंचा हा एक हुशार आणि जोरकस संकर आहे. जागोजाग याला टाळ्यांची अपेक्षा आहे. त्यासाठी यात दमछाक करणाऱ्या रसहीन, औचित्यहीन बोलतानाची, तानपलट्यांची योजना आहे. नाटकात अतिरेकी नाटक ते 'मेलो-ड्रामा' तसे हे नाट्यसंगीतातले 'मेलो–म्युझिक' म्हटले पाहिजे. सामान्य प्रेक्षक या संगीत कसरतीने हमखास भारावून जातो.

आशा पोतदार यांचे नृत्य प्रेक्षकांना खूष करण्याइतके चपलगती, नयनरम्य आणि फिल्मी होते. तेवढे हडकर नजरेत भरत नाहीत. शारदा धुळेकर यांचे गाणे सफाईदार पण पुरुषी होते. इतके की एखाद्या तानेत त्या स्त्रीवेषातले राम मराठेच वाटतात. अभिनयात पंढरीनाथ बेर्डे यांनी संपादक कोलदांडे हा शिवराळ भान-गडचा संपादक 'तो मी नव्हेच' मधल्या लखोबा लोखंडेच्या लकबी आणि दामू-अण्णा मालवणकरांच्या ढेकूण मिश्र एकत्र करून उभा केला आहे. रांगणेकरांचे दिग्दर्शन जाणवते ते एक इथे आणि दुसरे राम मराठे यांच्याकडून क्वचित घड-णाऱ्या साफ आणि प्रसंगानुरूप अभिनयात. बाकी या नाटकाला फक्त संगीत दिग्दर्शनच आहे.

या नव्या संगीत नाटकात नाटक शोधणाऱ्या आणि मागणाऱ्या प्रेक्षकांची तृप्ती होणे कठीण. संगीत शोधतील त्यांना ते भरपूर सापडेल. परंतु कानात रेंगाळणारे फारसे काही नाही. दणदणीतपणा हाच त्याचा मोठा आणि तात्कालिन गुण.


आज ना उद्या संगीत नाटकांची आणि नाट्य संगीताची पारंपारिक चौकट धंदेवाईक गल्लानिष्ठांनाही मोडावी लागेल अशी स्पष्ट चिन्हे गोखल्यांच्या या नाटकात आणि त्यातल्या संगीतात दिसत आहेत.

O

# जगण्यात खरोखर जग मरते

जगण्यात खरोखर जग मरते
ह्या खडतर पथि किति रखडत ते
उसंत नाही जिवाला जरा
घाण्याचा तो बैलही बरा
'मरा मरा' मंत्र एकचि खरा
ह्या म्हणों कुणी जीवन परते ।।
परिस्थितीची नाकी वेसण
नाचावे करण्या जनरंजन
चुकता थोडे, निर्दय ताडन
[परि, नच चुकता–श्रेय न मिळते ।।]
जीवन सर्कशिचे जणू अंगण
त्या धावतो धरुनी रिंगण
परिस्थिती उस्ताद प्रतिक्षण
फटक्यावरि फटके ओढित ते ।।
किती रडावे ? किती कढावे ?
खडतर पथि ह्या किति रखडावे ?
[रोजच मरत्या कुणी रडावे ?]
हे जिते मरण नच परवडते ।।
मृत्यु एक ही आस सामुरी
ध्येय तीच आकांक्षा सारी
तिलाच कवटाळण्या भरारी–
मारण्या अधिर मन तडफडते ।।
येइ सावळचे मरण माउली
अक्षय विश्रांतिचे साउली
ठाव देई गे तुझ्या पाउली
घे पदराखाली घे माते ।।
थंडथंडशा त्या ओष्ठांनी
चुंबी, जीवन-दिन संपवुनी
अक्षय विस्मृतिच्या मधुस्वप्नी
जोजवी माउली ! निजहाते ।।

ध्रुव टिळक



# आस्वाद

'जगण्यात खरोखर जग मरते' हे शीर्षक ध्रुव टिळकांनी ताम्ब्यांच्या प्रसिद्ध कवितेवरून घेतले आहे हे उघडच दिसते. मृत्यूला मातेची उपमा दिली आहे. अर्थात हीही एक भूमिका असू शकते यात शंका नाही. पण तांब्यांच्या मूळ कवितेत काव्यमयता आहे तर या विवेचनात तर्ककर्कशता आहे. मृत्यु-माउलीला केलेल्या आवाहनातच काही रसाळपणा उतरला आहे. स्पष्टीकरणे जास्त वाटतात. उल्लेखप्राचुर्य कवितेच्या वजनाला पेलेल इतकेच असावे. बाकी कवितेत तशा न फुटणाऱ्या गाठी नाहीत. रचनेत टिळक-सांप्रदायातला सुबोधपणा आहे.

गोपिनाथ तळवलकर

# ५

# उर्दूचे भवितव्य

उत्तर प्रदेशात आणि बिहार या राज्यांत सध्या उर्दू भाषेला दुय्यम राज्यभाषेचा दर्जा देण्याच्या मागणीवरून वादळ उठले आहे. या मागणीमागील राजकीय बाजू तूर्त बाजूला ठेवून उर्दूच्या व्यापक प्रश्नाचा विचार केला जाणे आता आवश्यक होऊन बसले आहे.

भारतात उर्दूच्या भवितव्याबाबत आजची परिस्थिती निर्माण झाली आहे, तिला मुसलमानांनी स्वतःला आणि पाकिस्तानचे निर्माते कायदेआझम जीना यांना जबाबदार धरणे अधिक उचित ठरेल. कारण स्वातंत्र्यापूर्वी जेव्हा जेव्हा भारताच्या राष्ट्रभाषेचा प्रश्न चर्चिला जाई तेव्हा तेव्हा मुस्लिम लीग उर्दू राष्ट्रभाषा करण्याची मागणी करी. संस्कृतनिष्ठ हिंदी राष्ट्रभाषा व्हावी असा आग्रह धरणारा एक वर्गही टंडन यांच्या रूपाने अस्तित्वात होता. गांधीजींची हिंदुस्थानीची योजना तडजोड म्हणून आणि अधिक व्यवहार्य म्हणूनही न्याय्य होती. मुसलमानांनी या योजनेला कधी पाठिंबा दर्शविला नाही. त्यांचा आग्रह उर्दू येथील सर्व जनतेने राष्ट्रभाषा स्वीकारावी हा होता.

काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाचा तेजोभंग करून मुस्लिम लीगने आणि पर्यायाने मुसलमानांनी पाकिस्तानची मागणी पदरात पाडून घेतली, तेव्हाच खऱ्या अर्थाने भारतातील उर्दूचे भवितव्य त्यांनी धोक्यात आणले. कारण भारताच्या एकतेखातर अखंडत्वाकरिता आणि भिन्नधर्मीय एकसंध समाजव्यवस्थेच्या निर्मितीखातर हिंदूंनी हिंदुस्थानीचा स्वीकार करून काही प्रमाणात उर्दू शिकायची किंमत दिली असती. फाळणी झाली आणि हा वादच निकालात निघाला असे नव्हे तर हिंदु-

हमीद दलवाई

स्थानची बाजूही कमकुवत बनली. हिंदुस्थानीऐवजी हिंदी ही भारताची राष्ट्र-भाषा ठरविण्यात आली.

आणि आता हा सर्व इतिहास विसरला जावा आणि हिंदुस्थानीने उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांत हिंदीची जागा घ्यावी अशी मुसलमानांची मागणी आहे! परंतु आधीची ही पार्श्वभूमी पाहता आता कोणत्याच राज्यातील हिंदू उर्दू लिपी आणि पर्यायाने भाषा शिकण्यास तयार होणार नाहीत.

उर्दूला दुय्यम राज्यभाषांचा दर्जा देण्याबाबत मुसलमान मागणी करताना अनेक युक्तिवाद करीत असतात आणि ते बहुधा परस्परविरोधी असतात. उदा. उर्दू ही काही मुसलमानांचीच भाषा नाही असे एके ठिकाणी म्हटले जाते. उर्दू ही जर मुसलमानांचीच भाषा नसेल तर मग मुसलमान तेवढे उर्दूची हिरीरीने कशाला मागणी करीत असतात? उर्दू ही आमची भाषा आहे असे हिंदूंनी म्हटले पाहिजे. परंतु ते तसे म्हणत नाहीत व ते उर्दूची मागणी करीत नाहीत तरी त्यांच्यावर ती भाषा लादली जावी असे मुसलमानांचे म्हणणे आहे काय? (हा युक्तिवाद हिंदु-महासभेच्या 'शीखदेखील हिंदूच आहेत' या युक्तिवादासारखा झाला! आपण वेगळे नाहीत; हिंदूच आहोत असे शिखांनी म्हटले पाहिजे. ते तसे म्हणत नाहीत.) उत्तर प्रदेशातील सर्वच जनतेने उर्दू मातृभाषा आहे असे म्हटले असते तर हा प्रश्नच निकालात निघाला असता. परंतु लोकसंख्येच्या केवळ १८ टक्के जनतेने आपली भाषा ८४ टक्के जनतेने स्वीकारावी ही मागणी करावी, हा आश्चर्यजनक प्रकार आहे.

## उर्दूची वाढ

उर्दूच्या या प्रकाराची एक दुसरी बाजूही समजावून घेणे आवश्यक आहे. भारतात काश्मीर राज्य सोडले तर उर्दूला आज कुठेच राज्यभाषेचा दर्जा नाही. काश्मीरमधील काश्मीरी, डोगरी, आणि लडाखी जनतेत स्वतःच्या अनुक्रमे कश्मीरी, डोगरी आणि लडाखी या बोलीवजा मातृभाषांविषयी आता आत्मीयता निर्माण झाली असल्यामुळे उर्दूचे आसन त्या राज्यातही स्थिर होणे कठिण आहे. यामुळे उर्दू भाषिक देशभर सर्वत्र पसरले आहेत आणि उर्दू भाषिक असे कोणतेच राज्य नाही अशी चमत्कारिक परिस्थिती उद्‌भवली आहे.

ही परिस्थिती तशी नवी नाही. उर्दूची वाढ आणि या भाषेचा मागील इतिहास याला कारणीभूत आहे. मोगल राजकर्त्यांची भाषा म्हणून ती मान्यता पावली आणि मोगल राज्यकर्ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी ती सक्तीने इतरेजनांवर लादली. भाषेतील शब्द हे हिंदीच्या खडी बोलीतून घेतले गेले असल्यामुळे ती आत्मसात केली गेली. लष्कराच्या आणि राज्यकारभाराच्या उपयुक्ततेकरता निर्माण केलेल्या या भाषेला ती उपयुक्तता संपताच पोरकेपण लाभले याबद्दल आश्चर्य वाटण्याचे किंवा खंत करण्याचे काही कारण नाही. स्थित्यंतरातील या ऐतिहासिक प्रक्रिया आपण समजावून घेतल्या पाहिजेत.

उर्दू भाषा आणि उर्दू साहित्य यांची आपण गल्लत करता कामा नये. उर्दू भाषा आज ना उद्या असेच चालू राहिल्यास नष्ट होईल असे मुसलमानांचे म्हणणे आहे. ती नष्ट होणार असेल तर मुसलमान तिला वाचवू शकणार नाहीत. ती जिवंत असेल तर त्याचे सर्व श्रेयही मुसलमानांकडे जात नाही. मुसलमानांनी आपली उर्दू-विषयीची भूमिका आधी नेमकी ठरवावी ! उर्दूतून शिक्षण मिळावे अशी त्यांची मागणी असेल तर वादच उपस्थित होत नाही. भारतातील सर्व मुसलमानांची भाषा उर्दू असल्यास त्यांचा दावा कोणी मान्य करू शकणार नाही. तथापि जिथे जिथे उर्दूतून शिक्षण मिळावयाची मागणी मुसलमान करतील तिथे तिथे ती देण्यात यावी. तशी ती आजच देण्यात येत आहे. भारतातील जवळ जवळ आठ-दहा राज्यांत उर्दूच्या प्राथमिक आणि दुय्यम शाळा आहेत. त्यांना सरकारतर्फे अनुदाने देण्यात येत असतात. असे असतानादेखील भारतात उर्दची गळपेची होत असल्याची ओरड का करण्यात येत आहे !

मुसलमानांचा या बाबतीत युक्तिवाद असा की आम्हांला उर्दूतून शिक्षण घेण्याची सोय करून देण्यात येते यात शंका नाही. परंतु कुठलीही भाषा राजाश्रयाखेरीज टिकू शकणार नाही. शिवाय सरकारी मान्यता नसलेल्या भाषेचा आम्हांला व्यवहारात काहीच उपयोग नाही हे धोरण दुटप्पीपणाचे आहे. हळू हळू एक तर उर्दू नष्ट होईल किंवा मुसलमान समाजच एका बाजूला फेकला जाईल. तो उर्दू टाकू शकत नाही कारण त्याचा सांस्कृतिक ठेवा उर्दूभाषेच्या रूपाने त्याने जतन करून ठेवला आहे.

हा युक्तिवाद नवा नाही. गेली वीस वर्षे तो वारंवार करण्यात येत आहे. पहिली गोष्ट अशी की, मुसलमानांनी येथील विशाल राष्ट्रीयत्वाच्या प्रवाहात स्वत:ला सामील करून घ्यायचे आहे की नाही याचा आधी निर्णय घेतला पाहिजे. येथे राष्ट्रीय प्रवाहात सामील होणे हा मी मर्यादित अर्थाने शब्दप्रयोग करीत आहे. स्वत:चे धार्मिक अस्तित्व टिकविण्यापुरता वेगळेपणा सर्वच धर्मगटांनी राखून ठेवला आहे. केवळ मुसलमानांना आपण या बाबतीत अपवाद समजण्याचे कारण नाही. परंतु वेगळेपणाचा आणि राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होण्याचा मुसलमान लावीत असलेला अर्थ सर्वस्वी फुटीरपणाचा आहे. मुसलमान समाजाला जाणून-बुजून इतर समाजापासून आणि विशषत: हिंदू समाजापासून अलग ठेवण्याचा एक पद्धतशीर प्रयत्न आपल्या देशात सतत अस्तित्वात आहे आणि हा प्रयत्न मुस्लिम सुशिक्षित वर्ग सतत करीत आला आहे. उर्दू हे या प्रयत्नातील एक हत्यार होऊन बसले आहे. सुशिक्षित मुसलमान वर्गाने उर्दू हत्यार म्हणून वापर करणे आधी ताबडतोब बंद करावे. हिंदी शिकल्यानंतर मुसलमान हा मुसलमान राहणार नाही आणि त्या भाषेतील काही प्रतीके आणि प्रतिमा बाळगणारा मुस्लिम धर्म वापरू शकत नाही असा आचरट युक्तिवाद अद्यापही सुशिक्षित मुसलमान करताना आढळतात.

**थोडक्यात, मुसलमान हा मुसलमान राहिला पाहिजे, एवढाच या सुशिक्षित वर्गाचा आग्रह नसून तो त्याच्या कल्पनेतील मुसलमान राहिला पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे आणि त्याच्या कल्पनेतील मुसलमान हा सदैव इस्लामच्या धर्मश्रेष्ठत्वाच्या भावनेने पछाडलेला असला पाहिजे, असा त्याचा साधा आणि सरळ अर्थ आहे.**

हा आग्रह कोणीही उदारमतवादी मनुष्यमात्र करणार नाही. एकतर धर्माच्या जुन्या चौकटींना तो कवटाळून बसलेला आहे म्हणून व दुसरे असे की, त्याला हिंदीला छुपा विरोध करावयाचा आहे म्हणून भारताची राष्ट्रभाषा म्हणून एकदा हिंदी ठरविली गेल्यानंतर मुसलमानांना तिला विरोध करण्याचा आणि तिच्या जागी हिंदुस्थानी आणून बसवण्याचा काहीही आधिकार प्राप्त होत नाही. येथे द्र. मु. क. च्या हिंदी-विरोधाशी मुसलमानांच्या हिंदी-विरोधाची तुलना करण्याचा मोह अनेकांना होईल. परंतु ती तुलना चुकीची आहे. कारण, मुसलमानांचे सर्व प्रकारे समाधान करण्याचे प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर त्यांच्या मागणीखातर पाकिस्तानला जेव्हा मान्यता देण्यात आली तेव्हाच हे सर्व वाद संपले, असे आता मानले गेले पाहिजे. मुसलमान तसे मानीत नसतील तर त्यांना तसे स्पष्टपणे सांगणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

मुसलमान सुशिक्षित वर्गाला अजूनही मध्ययुगीन कल्पनांतून बाहेर पडता आलेले नाही याचेही हा वाद हे एक उदाहरण आहे. मुसलमानांचे सर्व धार्मिक आणि इतर

साहित्य उर्दूतून आहे परंतु मुसलमानांचा धर्म आणि हा सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासाठी हिंदूंनी उर्दू शिकणे हा मार्ग नव्हे ! मुसलमानांनीच तो आपापल्या प्रादेशिक भाषेतून आणणे हाच त्यावर खरा इलाज आहे. जे कार्य एकेकाळी हिंदू समाजाबाबत ज्ञानेश्वरांनी केले तेच कार्य सुशिक्षित मुसलमान वर्गाने धाडसाने पुढे येऊन केले पाहिजे.

राज्यमान्यतेशिवाय एखादी भाषा जोपासली जात नाही हे खरेच आहे. तथापि राज्यमान्यता नसली तरी एखादी भाषा मरत नाही हेही एक सत्य आहे. हिंदीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. ती दुर्लक्षिली गेली. एखाद्या गंजलेल्या हत्यारासारखी तशीच पडून राहिली. परंतु मेली नाही. आज तिच्या परिभाषेविषयी जो गोंधळ निर्माण झाला आहे; प्रतिशब्द शोधण्याचा जो कष्टदायक प्रयत्न होत आहे तो या ऐतिहासिक पार्श्वभूमीचाच एक भाग आहे. आज ज्या तऱ्हेने हिंदी भाषिक प्रदेशां-तील सुशिक्षित वर्ग हिंदीला कृत्रिम आणि बोजड स्वरूप देण्याचा प्रयत्न करीत आहे तो मलाही नापसंत आहे. तथापि हा प्रवाह कुठेतरी खंडित होईल. खडी-बोलीच्या शब्दभांडाराने हिंदी पुढे अधिक सुटसुटीत, संपन्न होईल यांत मला शंका वाटत नाही. तशी ती बनवणे हे आपणा सर्वांचेच कार्य आहे. या कार्यात मुसल-मानांनीही सहभागी व्हावे; त्यांना सहभागी होता येईल आणि राष्ट्रभाषेला संपन्न बनवण्याचे थोडे तरी श्रेय लाभेल. परंतु, त्याकरिता त्यांनी आजची हिंदीकड पाहा-वयाची दृष्टी बदलली पाहिजे. उर्दू तेवढी संपन्न भाषा आहे आणि बाकीच्या सर्व भारतीय भाषा भिकार आहेत असा अहंगंड मुसलमानांनी बाळगला आहे. तो त्यांनी आधी टाकून द्यावा !

## हैदराबादचे काय ?

मुसलमानांच्या भाषेची भारतात गळचेपी होत असल्याची मुसलमानांची तक्रार ऐकून मला कधीकधी हसू येते. गतकाळात सतत डोकावण्यात काहीच हशील नाही आणि त्यापासून काही फायदाही नाही. तथापि कधी कधी ते आवश्यक होऊन बसते. हैदराबाद संस्थानात निजामाचे राज्य असताना तेथील मुस्लिम राजवटीने इतर भाषांना दिलेल्या वागणुकीची आठवण या संदर्भात आल्याखेरीज राहत नाही. मराठी, तेलगू आणि कानडी या भाषांना दुय्यम राज्यभाषेचा दर्जा देण्याचे तर लांबच राहिले. उर्दू तेथे हिंदूंवरदेखील सक्तीने लादण्यात आली हे अन्याय्य आहे असे बोलणारा एकही हरीचा लाल तेव्हा का निघाला नाही ? हिंदूंनी निदान उर्दू शिकायची भारतात बंदी केलेली नाही. मुस्लिम सहिष्णुतेचा त्या भागात मुसल-मानांनी आदर्श घालून द्यावयास हवा होता. परंतु हैदराबाद राज्यातील हिंदूंना त्यांच्या मातृभाषेपासून वंचित करताना आपण काही वावगे करीत आहोत असे मुसलमानांना काही वाटले नाही. वास्तविक या साऱ्या कृत्याबद्दल कडवट प्रतिक्रिया न बाळगता आज हिंदू-मुसलमानांना उर्दूतून शिकण्याची सोय उपलब्ध करून देत

आहेत. आणि तरीही मुसलमानांचे तेवढ्याने समाधान झालेले नाही. उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांतील हिंदूंनीदेखील ती शिकावी असा त्यांचा आग्रह आहे. हा केवळ उद्धटपणा आणि अरेरावी आहे. ही मान्य होणे सर्वथैव अशक्य आहे !

उर्दू भाषा भारतातून नष्ट होईल काय ? या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. कदाचित नष्ट होईल. कदाचित नष्ट होणार नाही. जगातील अनेक भाषा नष्ट झाल्या. संस्कृतचे काय झाले ? लॅटिन कु` उरली आहे ? उर्दूचीही गत त्या भाषांसारखी होणार असेल, तर ती प्रक्रिया कोणीही रोखू शकणार नाही. परंतु पाकिस्तानात राहील, ती भारतातच राहिली पाहिजे हा मुसलमानांचा आग्रह चमत्कारिक आहे. पाकिस्तानचा 'प्रदेश भारताबाहेर गेला पाहिजे व त्याचे वेगळे राष्ट्र झाले पाहिजे असा आग्रह धरणारांनीच उर्दू भारतात राहिली पाहिजे म्हणावे याखेरीज राजकीय विनोदाचा दुसरा उच्चांक कोणी करू शकणार नाही !

भारतीय मुसलमान प्रादेशिक भाषांचे अस्तित्व मानतात की नाहीत ? या भाषा ते आपल्या भाषा म्हणायला तयार आहेत का ? तसे झाल्यास हा प्रश्न उरणार नाही. त्यांनी उर्दूतून हवे तर शिकावे, परंतु प्रादेशिक भाषा आत्मसात कराव्यात. या बाबतींत आपण अमेरिकेचा आदर्श आत्मसात करणे योग्य ठरेल. अमेरिकेत अनेक भिन्न भाषिक गट अस्तित्वात आहेत. त्यांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षण घेण्याची, त्यांच्या भाषेत व्यवहार करण्याची, वृत्तपत्रे काढण्याची अशी सर्व प्रकारची सवलत अस्तित्वात आहे. परंतु अमेरिकन नागरिकत्व प्राप्त व्हायला त्यांना चांगली इंग्रजी येणे आवश्यक असते. **भारतातही आजच्या प्रादेशिक भाषा या त्या त्या राज्याच्या रहिवाशांना राज्यातील नागरिकत्वाच्या सवलती मिळण्यास आवश्यक मानल्या गेल्या पाहिजेत.**

**मुसलमानांनी या धोरणाच्या चौकटीत स्वतःच्या शैक्षणिक आणि मातृभाषाविषयक धोरणात बदल करणे हाच एक उर्दूचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग आहे.**

परंतु उर्दूला भाषिक दर्जा दिला गेल्याने काही राज्यांत पुन्हा खालपासून वरपर्यंत धार्मिक विभागणी होईल आणि एका नव्या संघर्षाला आपल्याला तोंड द्यावे लागेल; उर्दूची आजची स्थिती कायम राहिली तर कदाचित उर्दू नष्ट होईल. आज तरी मला हे दोन पर्यायं आणि त्याचे परिणाम दिसतात. तिसरा एक पर्याय आहे. उर्दूला देवनागरी लिपी लावण्याची. त्यामुळेही कदाचित उर्दू वाचू शकणार नाही. कारण संस्कृतप्रेमी हिंदी अभिमान्यांचा कल उर्दूतील शब्द हिंदुस्थानातून बाहेर फेकण्याचाच राहील. परंतु हा धोका पत्करला गेला पाहिजे. कदाचित त्यामुळे हिंदी अधिक संपन्नही होईल. उर्दू लिपीवजा नवी हिंदुस्थानी भाषाही अस्तित्वात येऊ शकेल. हा प्रयोग करून पाहता येण्यासारखा आहे.

○

# मूर्ति



सैय्यद अकबर

'तुझा अंगठा कसा आहे ?'
'बरा आहे,' ती म्हणाली
'तुझा ?' तिनं विचारलं
माझ्या जखमा तशाच असतात,
दगडावरील छन्नीच्या घावासारख्या !

रात्र व्हायला आली होती. सगळीकडे सामसूम भासत होते. पक्ष्यांच्या घरट्यां-कडच्या भराऱ्याही संपल्या होत्या. क्वचित एखादा भटकलेला पक्षी काय तो आभाळातून उडत जाताना आढळत होता. नुकतीच कच्च्या सडकेने जाणाऱ्या मोटारीने उडविलेली धूळही जमीनदोस्त झाली होती. आणि काजळी रंगाने आकाश व्यापायची तयारी चालविली होती.

या सर्व वातावरणातून एक उणीव मात्र भारदस्तपणे जाणवत होती. या हजार-हजारांच्या वस्तीत साऱ्यांच्या परिचयाचा भासणारा ' टकटक ' आवाज आज ऐकू येत नव्हता.

आणि त्यामुळेच आजची ही शांतता मोठ्या उणीवेनं मनात सलत होती.

विश्वासने शिल्पकलेचं ज्ञान घेऊन येऊन दोन वर्षे तरी होत आली होती व नंतर त्याने तोच उद्योग या खेड्यातही चालू ठेवला होता. गावातल्या सर्व लहान–मोठ्या मूर्ती त्याच्याच हातच्या होत्या; इतरही अनेक ठिकाणांहून त्याच्या मूर्तींसाठी सतत मागणी राहिली होती व शक्य तितक्या त्याने पुरविल्याही होत्या. हातांतल्या कसोटीनंच त्याचं नाव सगळीकडे झाले होते. त्याला कुठलीही मूर्ती कोरताना कशाचे वावडे नव्हते. अगदी मारुतिरायाच्या ओबडधोबड मूर्तीपासून तो केनेडीच्या मुखा-वरचे भावही तो आपल्या हातच्या कौशल्याने शिलेवरही साकार करू शकत होता. त्यामुळेच त्याचे नाव खेड्यापासून ते शहरापर्यंत सुपरिचित होते.

त्याचा स्वभावही तसाच स्नेहमय होता. त्यामुळे त्याच्या जवळ डुबाभाऊपासून तो खादीधारी ध्येयवाद्यापर्यंत सारेच प्रेमाने बोलत.

दररोजच्या 'टकटकी'च्या आवाजाने भरलेल्या त्याच्या खोलीत कुणीही घुसावे आणि विचारावे—

" काय विश्वास, कशाची मूर्ती आज ? "

विश्वासनं हळूच हसून उत्तर द्यावं,– " काय घडेल त्यावर अवलंबून आहे. प्रयत्नांत मानव घडवायचा आहे. माकड नाही घडले म्हणजे मिळवले ! "

अशा तऱ्हेने साऱ्यांना आपल्या कोमल आणि स्नेहमय स्वभावाने आपणाकडे आक-र्षित करून सतत दोन वर्षे त्याची मूर्ती कोरायची ' टकटक ' चालू होती. अनेक माणसं या काळात त्याच्याजवळ आली होती. हसली-खिदळली होती. त्यातच अनेक स्त्रियाही होत्या. मुलीही होत्या. गावाभरातला हा स्वच्छंद पण मर्यादित स्वभावाचा हा मुलगा ! त्याच्याजवळ कुणीही यावे, बसावे, बोलावे, पुसावे असे चालायचे !

अनेकांना विश्वासनं ळळा लावला होता... त्यातच बदर नावाची एक मुलगीही होती. ती सतत नियमितपणे विश्वासकडे यायची... तासन्तास बसायची. मूर्ती-कडे पाहायची. हातोडी छन्नी न्याहाळायची व मधूनच एखादा प्रश्न विचारायची, म्हणायची—

" विश्वास, दगडाला आकार देता यतो... मग मनुष्याला तसा का देता येऊ नये रे ? "

विश्वास आपल्या तंद्रीतच उद्‌गारायचा–

" ते कलाकारालाच साधेल. आणि त्याला कलाकारही तसाच हवा ! माझ्या-सारखा प्रहार करणारा ते साधू शकणार नाही."

कधी कधी अशाच गप्पा व्हायच्या. बदर जवळ जवळ विश्वासच्याच वयाची होती. अनेक पाहुणे तिला पाहून गेले होते. परंतु कुणीही स्वीकारीत नव्हते. अडचण फार मोठीं होती असे नव्हे. तिच्या पोटाचे एकदा ऑपरेशन झाले होते हीच अडचण ! परंतु मुसलमानी समाजातून – तेही गरीब घराण्यांतून – शंकाकुशंकांचे जाळे अद्याप तसेच होते... मूलबाळ होणार नाही. कदाचित तिला धोका होईल... अशा प्रकारच्या शंकाकुशंका काढून पाहुणे नकार देत.

आणि असल्या जाळयात बदर सतत धडपडत होती. स्वतःची सुटका दुसऱ्याच्या हाती होती. नाही म्हणायला तिला तिच्याच समाजातील एका तरुणाशी परिचय करून घेता आला होता. जवळिकीतून प्रेम निर्माण झाले होते. दोघेही एकमेकांवर खरोखरीच प्रेम करीत होते. परंतु बदरच्या पाठचे दुर्दैव काही अजून संपले नव्हते. एक दिवस वडिलांच्या आज्ञेचे पालन म्हणून त्या तरुणाने दुसरीकडे लग्नाचं निश्चित केलं. बदरला कळलं तेव्हा तिनं उशीत तोंड खुपसून सारी उशी ओली केली. सुजलेल्या डोळयांची व निष्प्राण चेहऱ्याची साक्ष देऊन तिनं परोपरीनं त्याला समजावलं. परंतु तरुणाचे मन बदलले नाही. बदरला दूर सारून तिच्या जीवना-तून जीवनाला स्पर्शही न करता तो अलग झाला.

बदरला वाटलं... मरावं... पण ते धैर्यही तिच्याजवळ नव्हते.

त्यानंतरचा विरंगुळा म्हणून तिला विश्वासच्या टकटकीचा आसरा मिळाला. घरकाम झालं की विश्वासच्या खोलीत जाऊन बसावं... पाहावं... निरखावं. मूर्तीच्या ओबडधोबड अवस्थेपासून तिच्यातल्या भावनेपर्यंतचे सारे आविष्कार नीट न्याहाळावेत असे तिचे रोजच चालू होते.

एक दिवस धीर धरून तिनं विश्वासला विचारलं–

" मला शिकवशील कला ? कलाकार बनवशील ? "

विश्वास म्हणाला होता–

" तुम्ही कापडावर विणावे. मशीनवर शिवावे. हार तुरे ओवावेत. दगडांना ठेचायला तशीच दगडी मने लागतात... चिपोऱ्यागणिक कठोर व्हावं लागतं. शिवाय ह्या छन्न्या, ही हतोडी ! "

बदर निरुत्तर झाली होती. काय बोलणार बिचारी ! परंतु तिच्या मनात राहून राहून सारखे वाटायचे – काय उणिवा आहेत आपल्यात ! आपण का करू शकणार नाही हे ?

परंतु विश्वासला परत तसं विचारायची तिची हिंमत कधीच झाली नाही.

दिवस उगवत होते, मावळत होते. प्रत्येक दिवसासोबत बदर-विश्वास जवळ येत होते. मोकळेपण वाढत होते... दोघांनाही एकमेकांच्या गैरहजेरीचा अभाव आता प्रकर्षानं जाणवू लागला होता. मृत्यूला समीप असणारे रात्र–दिवस त्यांना जवळ जवळ आणत होते. विश्वास स्वत: एक दिवस म्हणाला–

" तू मूर्ती घडवायला शिकणार होतीस ना ? "

" होय ! शिकवशील ? "

" खरेच शिकवीन. "

" उणिवा संपल्यात माझ्यातल्या ? "

" ते पाहू पुढे. पण मलाही वाटतं तुला शिल्पकला शिकवावी ! "

" बरं. तर कधी सुरवात ? "

" पंचांग पाहून ये भटजीजवळून. "

" चल ! तुझी आपली चेष्टाच सदान् कदा ! "

" मग ? काशीकडे जातेस ? "

" तुला शिकवायचे की नाही रे ? "

" शिकवीन ना ? "

" मग शुभस्य शीघ्रम ! "

विश्वासनं तिच्या हाती हातोडी दिली. छन्नी दिली. बदरनं ती धरली आणि विश्वासनं सांगितल्याप्रमाणं छन्नी ठेवून हातोडी आणली. परंतु बदरला काय हातोडी मारायला येणार होते? डाव्या हातच्या अंगठ्याला मार बसला तशी बदर विव्हळली.

विश्वासने घाम पुसायच्या रुमालाची टरकन एक चिंधी फाडली. आंगठ्यावर पट्टी आवळताना तो म्हणाला–

" बघ ! मी म्हणालो होतो ना की तुम्ही विणावं, शिवावं, हारतुरे करावेत. तेच खरं ना ? "

" हळू आवळ रे पट्टी ! " बदर म्हणाली.

" अग, मन एवढं घट्ट असावं लागतं तेव्हा कुठे काहीतरी साधता येतं माणसाला ! "

" तुझं आपलं वेगळंच ! तुला जिथे तिथे दिव्यार्थच आढळतो नाही तरी ! " असे म्हणत बदरनं चिंधी फाडलेली दस्ती उचलली व म्हटले,

" तुझी दस्ती फाडावी लागली तुला ? "

" दिव्यार्थासाठी माणसाला क्षुल्लक बाबींना असंच चिरडता आलं पाहिजे. राम दाखवण्यासाठी हनुमानानं नाही का आपलं ऊर फाडलं ! राम नाही म्हणून कंठ्यातले लाख मोलाचे हिरे दातांनी फोडणाऱ्यांचेही उदाहरण नाही का आपल्या समोर... ! आणि तू रुमालाची गोष्ट करतेस ? "

" बरं बरं ! मोठा परमात्माच की नाहीस तू ! "

" पण परमार्थ साधलांच की नाही आज मी ! "

विश्वासच्या शेवटच्या वाक्यातून बदरला वेगळाच अर्थ गवसला. चेहऱ्यावरचे भावार्थ लपवीतच हलक्या पावलानं ती घरी परतली.

घरी आल्यावर बदरला सारखे विचार भेडसावीत होते– काय असेल विश्वासच्या मनात ? आणि आपणांला वाटते तेच जर त्याच्या मनात असेल तर ते शक्य तरी आहे का ? समाजातले बंधन माझ्यासारख्या अबलेला कसे झुगारता येईल ? तिला सारे सारे आठवत होते.

पट्टी बांधतानाचं विश्वासचं ते वाक्य– ' मन एवढं घट्ट असावं लागतं माणसाचं तेव्हाच काही साधता येतं !'

दस्तीबद्दलचं त्याचं ते वाक्य ! – ' दिव्यार्थासाठी क्षुल्लक बाबींना असंच चिरडता आलं पाहिजे ! "

विश्वासची ही अशी वाक्ये सतत तिच्या कानात घुमत होती. काय करावे ? या प्रश्नाचं एक चक्र सतत तिच्या मनाभोवती फिरत होतं.

रात्र तिची अशीच गेली !

दुसऱ्या दिवशी सर्व दिवस ती विश्वासकडे गेली नाही. विश्वासनंही आपल्या बोलण्याबद्दलच्या पुन्हा पुन्हा विचार करीत सारी रात्र घालवली होती. व सवयी-नुसार तो आजही आपल्या मनात मग्न होता. मधूनच विश्रांतीसाठी थांबला की त्याला बदरचे स्मरण व्हायचे.

सायंकाळी मात्र बदर आली. चाहुलीकडे पाहताना विश्वासच्या हातातली हातोडी चुकून छन्नीवर न बसता अंगठ्यावर आली होती.

" येना ग !" रक्तानं माखलेल्या अंगठ्याला मुठीत दाबत विश्वास म्हणाला– " दिवसभर नाही आलीस !"

काय सांगावे बदरला कळेना. ती एवढंच म्हणाली– " कामं होती." अंगठ्याकडे लक्ष गेल्यावर तिनं विचारलं– " लागलं कारे ?"

" लागू दे !" असे म्हणून त्याने रुमालाने अंगठ्याचे रक्त पुसणे चालू ठेवले होते व नंतर त्याने दस्तीतूनच चिंधी फाडून आपल्या अंगठ्याभोवती गुंडाळली. पण त्याचा चेहरा पार उतरला होता. अचानक बदरचे लक्ष गेले. तिला वाटलं जखम मोठी असेल.

म्हणाली– " पाहू "

" राहू दे, बरी होईल आपोआप !"

पुढे कोणीच काही बोलले नाही.

घरी आल्यावर मात्र बदरला काहीतरी मनात टोचल्यासारखे वाटत होते. तिला राहून राहून आपण स्वतःहून दस्तीची चिंधी फाडून विश्वासच्या अंगठ्याभोवती

गुंडाळायला हवी होती असे सारखे वाटत होते. त्यानं किती जीवाभावानं स्वत:च्या जखमेपेक्षाही आपल्या जखमेवर काळजीपूर्वक चिंधीं बांधली होती ! तेच तिला का साधलं नाही याची तिला खंत वाटत होती.

स्वत:शीच ती पुटपुटली– "विश्वास म्हणत होता तेच खरे– आपण विणावं... इत्यादी, इत्यादी."

स्वत:च्या उणेपणाची लाजही वाटली तिला !

दुसऱ्या दिवशी तिनं विश्वासकडे जाऊन जखमेबद्दल चौकशी केली.

तेव्हा त्यानंच प्रतिप्रश्न केला,

"तुझा अंगठा कसा आहे ?"

"बरा आहे !" एवढंच ती म्हणाली.

"तुझा ?" तिनं पुन्हा विचारलं,

"माझ्या जखमा तशाच असतात, दगडावर छन्नीच्या घावासारख्या !" असं म्हणून त्यानं आपला अंगठा पुढे केला. खरोखरच त्यातून अद्याप रक्त येत होते.

"तू काम बंद कर."

"एवढ्यानं काय होतं ? सहनशीलता मर्यादित असता कामा नये कधी ! एवढ्या एवढ्याला काम बंद करून कसं चालेल ? कामाला तेवढाच उशीर होत असतो आणि क्षणही चुकला तर सारे चुकू शकते.

बदरला बोलता नाही आले. एरव्हीही विश्वासपुढं तिला नित्य श्रोत्याचीच भूमिका पत्करावी लागली होती.

अंगठ्याच्या घटनेलाही बरेच दिवस निघून गेले. दोघांच्याही स्मरणातून ती घटना नाहीशी झाली होती... जवळीक मात्र सारखी वाढत होती. काहूर माजवीत होती... विश्वासचं चित्त स्थिर होतं पण बदरबद्दल त्याला शंका होती... तिच्या निर्णयाबद्दल त्याच्या मनात चिंता होती आणि त्याची चिंता त्याच्या मुखावर स्पष्ट होत होती. त्याच्या कलेतल्या मूर्तीवरही अनेकदा त्याने चिंतित भाव कोरून ठेवले होते. स्वत:बद्दल मात्र तो स्वत:ला म्हणायचा–मनाला घट्ट केलंच पाहिजे... समाज काय करील ते करू द्या ! स्वत:च्या मनगटातल्या बळावर या समाजातली सारी बंधनं चिरगुटासारखी फाडून टाकली पाहिजेत आणि मनाला घट्ट बांधलं पाहिजे.

बदरच्या मनात मात्र खरं काहूर माजलं होतं...अनेक दिवसांपासून तिनं यौवन-सुलभ प्रवृत्तीला दाबून ठेवलं होतं...कधी न कधीतरी कुणीतरी येईल...बुरखा सारील आणि...

पण हे विचार क्षणभरच तिला सुखवू शकत. दुसऱ्याच क्षणी तिला आलेल्या, ऐकलेल्या स्थळाची स्मरणे होत... त्यांनी तिला नाकारले होते... पुढेही किती

नाकारणार आहेत हे तिला माहीत नव्हते... तेव्हा विश्वासबद्दल तिच्या मनात जास्तच आपुलकी निर्माण होई; परंतु तिला चिंता पुन्हा भेडसावत... समाजाची बंधनं तिला जाचक वाटत. कधी कधी तिला विश्वाससारखं घट्ट मनाचं व्हावसं वाटे. परंतु अंगठा ठेचाळण्याची शक्यता तिला जास्त लाचार करायची !

दिवसरात्री अशाच घरंगळत गेल्या. विश्वास–बदर स्पष्टपणे काहीच निर्णय घेऊ शकले नव्हते. बदरकडे पाहुणे येणे सुरूच होते. अशातच एक दिवस अचानक विश्वासला बदरचे कुठेतरी जुळल्याचे कळले... जवळ जवळ पूर्ण होत आलेली मूर्ती आता पुढे त्याच्याने कोरणे होईना ! कुणीतर आपल्या शरीरावर छन्नी-हतोडयांनी वार करीत असल्याचे सतत भासत होते. कुठलीतरी अनाकलनीय वेदना त्याच्या शरीराला व्यापून उरली होती. मूर्तीकडे एकटक पाहत तो बसला होता... तेवढयातच तिथे बदर आली.

" विश्वास ! "

तिच्या स्वरांत त्याला आज कुठलीतरी उणीव तिव्रतेनं जाणवली. तो एवढेच म्हणाला–

" आलीस ? "

बदर गप्पच राहिली. पुढे विश्वासच म्हणाला–

" कळलं मला. "

काहीतरी बोललं पाहिजे म्हणून बदर बोलली,

" मूर्ती तूच घडवली होतीस, भंगली समज. "

विश्वास यावर काहीच बोलला नाही. त्याने आपल्या जवळची सर्वांत मोठी हातोडी व सर्वांत मोठी छन्नी घेऊन जेवढया जोराने मूर्तीवर प्रहार करता येईल तेवढया जोरात प्रहार केला. बदर पाहतच राहिली होती...

पूर्ण होत आलेल्या आकृतीचे तुकडे तुकडे झाले होते. बदरनं भरल्या नेत्रानं त्याच्याकडे पाहिलं.

विश्वासच पुढ म्हणाला–


" बदर, मूर्तीचा भंग होताना शिळेचाही भंग होत असतो एवढीच जाणीव तुला करून द्यायची होती मला. तू जा आता. "

बदर काही बोलू शकली नाही. ती घरी परत आली.

दुसऱ्या दिवशी विश्वासची टकटक ऐकू आली नाही. सर्व ग्रामवासीयांना ही उणीव हृदयावर हतोडयाने घाव घातल्यागत जाणवत होती. त्यांना हवा असणारा आवाज संपला होता.

शिळाच भंगली होती.

O



## पुस्तके

श्रीगणेश हे भारतीयांचे लाडके दैवत. सुखकर्ता आणि दुःखहर्ता म्हणून त्याचे सर्वारंभी स्मरण-पूजन करण्याचा क्रम भारतात कित्येक शतके चालू आहे. त्याच्या माहात्म्यगायनासाठी संस्कृतात दोन पुराणे रचली गेली— गणेशपुराण आणि मुद्गलपुराण. गणेशपुराणातल्या 'गणेशगीते'ने गीता ग्रंथांच्या संभारात स्थान मिळवले. याशिवाय सहस्रनामे, अष्टके, स्तोत्र, कवचे, इत्यादी उपासना-साहित्याचा नेहमीचा संभारही निर्माण झाला. ज्ञान आणि कला यांचे स्फूर्तिस्थान म्हणून ग्रंथकारांनी गणेशाला सर्वोपरी मानले; एवढेच नव्हे, तर अनेक परमार्थसाधकांनी त्याला उपास्य मानून, परमतत्त्वाचा साक्षात्कार गणेशरूपात अनुभवला.

# 卐 श्री 卐
# गणेश
# प्रताप

महाराष्ट्राची गणेशाविषयीची प्रीती तर आगळी आहे. गणेशाच्या एकवीस महास्थानांपैकी अनेक स्थाने महाराष्ट्रात आहेत; एकवीस गणेशस्थानांच्या प्रसिद्धीनंतर गाजलेली अष्टविनायकांची स्थानेही महाराष्ट्रातच आहेत. महाराष्ट्रात सातवाहनांनी लढविलेल्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाचा विजयोत्सव लेण्याद्रीच्या साक्षीने साजरा झाला आहे.

यादवकाळात तर महाराष्ट्रातील मोठमोठ्या नगरांत प्रमुख रस्त्यांवरील चौकातून उत्तुंग गणेशमंदिरे उभी होती. यादवांचा चतुर करणाधिप महापंडित हेमाद्री गणेशभक्तीने रंगलेला होता. ज्ञानियांच्या राजाने गणेशाला समूर्त शब्दब्रह्माच्या रूपात पाहिले होते. तेव्हापासून आजपर्यंत हा गणेशाविषयींचा प्रेमा महाराष्ट्राने सांभाळला आहे. राघवचैतन्य, जनीजनार्दन, मध्वमुनीश्वर, निरंजनस्वामी, गोसावीनंदन, मोरया गोसावी, गणेशयोगींद्र इत्यादी अनेक साक्षात्कारी संतांनी महाराष्ट्रात गणेशभक्ती बहरास आणली. विसाव्या शतकारंभी महाराष्ट्रातील एका महापुरुषाने गणेशोपासनेच्या द्वारा राष्ट्रोत्थानाचे महान कार्य उभे केले.

'गणेशप्रताप' हा ओवीबद्ध ग्रंथ महाराष्ट्रीयांच्या गणेशप्रीतीचाच एक प्रसन्न आविष्कार आहे. संस्कृत गणेशपुराण हा या ग्रंथाचा मूलाधार. उपासनाखंड आणि क्रीडाखंड असे याचे दोन खंड आहेत. दोन्ही खंडांत मिळून एकूण ५६ अध्याय असून ओवीसंख्या आहे ५६६५ !

या ग्रंथाची रचना तशी फार जुनी नाही. गेल्या शतकाच्या मध्याला ( माघ शु. १४, शके १७७० – इ. स. १८४८ ) 'गणेशप्रताप'ची रचना सांगता पावली. कोणी विनायक महादेव नातू हे या ग्रंथाचे कर्ते होत. गणेशाचा महिमा जाणू इच्छिणाऱ्या, त्याच्या गुणसंकीर्तनाच्या श्रवणास रंगू इच्छिणाऱ्या आणि त्याच्या उपासनेची गोडी चाखू पाहणाऱ्या सर्वसाधारण जनांसाठी त्यांनी हा ग्रंथ रचला.

**इक्षुदंडाची मधुरिमा । अशक्त भक्षिता पावती श्रमा ।**
**तिची शर्करा करिता उत्तमा । भक्षणी सुगमा सुखतर ।।**
**तैसा संस्कृत पुराणाचा अर्थ । काढिता श्रम पावती अशक्त ।**
**यदर्थ तुष्टोनि एकदंत । ग्रंथ प्राकृत केला तेणे ।।**

अशी आपली लोकाभिमुख भूमिका ग्रंथकाराने स्पष्ट केली आहे. या उदार लोकाभिमुखतेनेच प्राचीन मराठी वाङ्मय सर्वतोमुखी झाले; ग्रंथलेखनाच्या सर्व अडचणीवर मात करून मुद्रणसुगमतेला मागे टाकण्याइतक्या आश्चर्यकारक गतीने ते सर्वत्र प्रस्तुत झाले आणि त्याने लोकमानसावर अमिट प्रभाव गाजवला.

'श्रीगणेशप्रताप' हा ग्रंथ अव्वल आंग्लाईत रचला गेला असूनही त्याचे अंतर्बाह्य वळण प्राचीन मराठी वाङ्मयाचे आहे. ग्रंथकाराची शैली अथपासून इतिपर्यंत सहजसुबोध आहे – प्रसाद आणि प्रसन्नता हे तिचे अंगभूत विशेष आहेत. कथेचे निवेदन आणि कथौघात येणाऱ्या विचारांचे विवेचन अगदी सरळ साध्या रीतीने

केले आहे. उदाहरणार्थ, सोमकांत राजाने आपल्या पुत्राला सांगितलेल्या राजधर्मातील पुढील काही ओव्या पाहा, म्हणजे आपणांस त्याचा प्रत्यय यईल.

**करावे नास्तिकांचे खंडन । न करावे अभक्ष्यभक्षण ।**
**वर्जावे परदारानिषेवण । स्वइच्छाचरण असावे ।।**
**माता - पिता - गुरु - स्मरण । सत्पाद् - धेनू - शुश्रूषण ।**
**जे का आपल्याशी शरण । त्यांचे रक्षण करावे ।।**
**जरी होईल प्राणांत । तरी सत्य रक्षावे निश्चित ।**
**जाणावे सर्वांचे मनोगत । हिताहित शोधावे ।।**
**संपूर्ण जन न विश्वासावा । सर्वत्र अविश्वास न धरावा ।**
**प्रशस्त धर्म आचरावा । अधर्म त्यागावा मुळीहून ।।**
**वैरियाहाती निजवर्म । पडू न द्यावे पुरुषोत्तम ।**
**सत्क्रियेस लावावे अधम । याचककाम पुरवावे ।।**
**कोणाचे कैसे आचरण । चारमुखे करावे श्रवण ।।**
**परधन न करावे हरण । तेणे कल्याण रायासी ।।**

या ओव्यांतील विचार चिरकालिक स्वरूपाचे असल्यामुळे ग्रंथकार शंभर वर्षांपूर्वीचा असूनही तो आजच्या परिस्थितीच्या संदर्भात लिहीत आहे असे वाचकांना जाणवून जाते.

हा इतका चांगला ग्रंथ प्रकाशकांनी अत्यंत देखण्या स्वरूपात छापला आहे. शुभ्र कागद, ठळक टशांतील सुबक छपाई, उत्तम बांधणी, वेष्टनावर चित्रकार दीक्षितांनी रेखाटलेले ऋद्धिसिद्धिसहित गणेशाचे सुंदर रंगीत चित्र आणि आत प्रारंभीच अष्टविनायकांची सुस्पष्ट छायाचित्रे – या सर्व वैशिष्टयांमुळे ग्रंथ अत्यंत आकर्षक बनला आहे. गणेशभक्तांनाच नव्हे, तर सर्वसाधारण आस्तिक हिंदूंनाही हा एक बहुमोल प्रसाद आहे. इतक्या चांगल्या स्वरूपात ग्रंथ छापल्याबद्दल वाचक प्रकाशकाला निश्चितच धन्यवाद देतील.

प्रकाशकीय निवेदनात केवळ अनवधानाने ग्रंथरचनेचा शकांक १७७० ऐवजी १७७७ पडला आहे आणि " बांधणी स्वरूपात पोथीग्रंथ हा पहिलाच असावा," हे अपुऱ्या माहितीवर आधारलेले विधान लिहिले गेले आहे.

मराठी वाचकांनी या ग्रंथाचे स्वागत करून प्रकाशकांना अशा प्रकाशनांसाठी अधिक उत्साहित करावे, अशी माझी अपेक्षा आहे.

रामचंद्र चिंतामण ढेरे

**' श्रीगणेशप्रताप ' विनायक महादेव नातू – विरचित**
**प्रकाशक : मा. त्रि. परचुरे, श्रीमयूरेश प्रकाशन**
**पृष्ठे ३९१ (डबल क्राउन). मूल्य १५ रुपये.**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ नयनबाणांनी दंगा मोडणारे पोलीस

युद्धामुळे विज्ञानाची प्रगती होत असते असे मी कोठे तरी वाचले होते. बंगालमध्ये दंग्याचे प्रमाण फार वाढून अखेर तेथले पोलीस बंदुका–ढाली वापरायला लागले तेव्हा ही गोष्ट मला थोडीफार पटली होती. आता अमेरिकेहून अधिक पुरावा आला आहे. तेथल्या पोलिसांनाही आता बरेच दंगे मोडावे लागत असल्याने एका अमेरिकन कंपनीने केळीच्या सालाप्रमाणेच रस्ता बुळबुळीत करणारे एक रसायन तयार केले आहे, तर दुसऱ्या एका कंपनीने जंगली जनावरांना जिवंत पकडण्यासाठी " ट्रँक्विलायझर " औषध लावलेले बाण मारून त्यांना शांत करतात तसे बाण माणसांसाठी तयार केले आहेत. पाहिलेत ? प्रत्येक बाबतीत स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या अमेरिकेने स्वतःच्या पायावर उभे राहता येऊ नये अशी युक्तीदेखील शोधून काढली आहे. हिंदुस्थानात दंगेखोरांचा धुमाकूळ पाहिला की सरकारचे हात केळी खायला गेले आहेत की काय असा सामान्य माणसाला प्रश्न पडतो. पण मला वाटते की पोलिसांच्या हातात केळी आणि दंगेखोरांच्या पायांत केळीच्या साली अशी व्यवस्था झाली तर केळी खाण हा पोलीस बंदोबस्ताचा एक महत्त्वाचा भाग होऊ शकेल. ते काही असले तरी भारतातून रशियाला केळी निर्यात होतात असे मी वाचले होते; तेव्हा रशियाला केळी व अमेरिकेला केळीच्या साली निर्यात करण्याचा चाणाक्षपणा भारत सरकारने दाखवला असता तर प्रत्येक घसरणाऱ्या अमेरिकन दंगेखोरामागे किमान एखादा डॉलर परकीय चलन भारताला नक्कीच मिळविता आले असते. आणि ट्रँक्विलायझर बाण म्हणजे तर दंग्यावर रामबाण औषध दिसते. कोदंडपाणी अमेरिकन पोलिसांनी आता शरसंधान केले की मानसिक नाही तरी रासायनिक शांतता नक्कीच प्रस्थापित होईल.

अमेरिकन दंग्यांतून निघालेले हे शोध भारतीय दंग्यात उपयोगी पडतील की नाही ? मला वाटते तोंडघशी पडण्याची कला आम्हा भारतीयांना आधीच चांगली अवगत असल्याने रस्ता मुद्दाम बुळबुळीत करण्याची आवश्यकता नाही. त्यातून बुळबुळीत रस्ता हवाच असेल तर नगरपालिकेच्या कृपेने तो खास देशी घाणीने आधीच तसा झालेला असतो, तेव्हा परदेशी रसायनाची जरुरीच नाही. त्यातूनही माणूस आपटी कशी खातो याचे आपल्या पोलिसांना शास्त्रीय निरीक्षण करायचे

असेल तर त्यांनी गेल्या निवडणुकीत डिपॉझिट जप्त झालेल्या कोठल्याही उमेदवाराचे प्रात्यक्षिक ठेवावे. एवढेही करून दंगेखोरांचा तोल गेला नाही तर शांतता आणि अहिंसा असे डबल रसायन लावलेले बाण सोडायला हरकत नाही. पण तसे कशाला, नयन–बाणांनी विद्ध होणे भारतात प्राचीन कवींपासून आधुनिक फिल्मी गीत–कवीपर्यंत सगळयांना ठाऊक आहे; तेव्हा पोलिसांनी प्रेमाचे 'कटाक्ष' टाकायचा अवकाश, दंगेखोर घायाळ झालेच म्हणून समजा ! मात्र अशा वेळी पोलिसांना एक धोक्याची सूचना द्यावी लागेल–" जरा नजरोंसे कह दो जी, निशाना चूक ना जाए..."

## ☐ माझ्या खुनाची मज्जा

कुठल्याशा मराठी नाटकात रटाळ आयुष्याला विटलेली एक वयस्क बाई म्हणते, " अय्या, माझा खून झाला तर किती मज्जा येईल ! " बिच्चारी. भारतीय माणसाचे जीवन नाही तरी कंटाळवाणेच–अन् वाईट गोष्ट म्हणजे मरणही तितकेच कंटाळवाणे. लहानपणी मास्तरांच्या व मोठेपणी हेडक्लार्कच्या धाकात मान तुकवून निमूटपणे दिवस काढायचे, आणि पेन्शनीत निघाल्यावर एक दिवस चाळीच्या चौकात छोटीशी दुखवटयाची सभा भरवायला निमित्त द्यायचे–बस् ! पण अमेरिकेत हा रटाळ प्रकार नाही...निदान अमेरिकन मरण तरी यापुढे अधिकाधिक इंटरेस्टिंग होत जाणार असा रंग दिसतो. अमेरिकेत गुन्ह्यांच्या वाढत्या प्रमाणाबद्दल बोलताना तेथल्या एका तज्ज्ञाने नुकतेच असे मत प्रकट केले आहे की, १९७० पर्यंत जन्माला आलेल्या प्रत्येक अमेरिकन स्त्री–पुरुषाला ६० वर्षांचे वय होईपर्यंतच्या काळात आपला खून होण्याची किंवा निदान आपल्यावर प्राणघातक हल्ला होण्याची 'अपेक्षा' करता येईल ! आता बोला ! यापुढे सर्वसाधारण माणूस पूर्वीप्रमाणेच मरणाची भीती बाळगेल–पण अमेरिकन माणूस मरणाची अपेक्षा बाळगेल. त्यातूनही सर्वसाधारण अमेरिकन नागरिक आपल्यावर हल्ला होण्याची अपेक्षा करील तर अधिक महत्त्वाकांक्षी माणसाचे स्वतःचा खून झाल्याखेरीज समाधान होणार नाही. उलट भारतात काय परिस्थिती आहे ? माझेच उदाहरण घ्या–अजूनही मी समोरून मोटार आली की फूटपाथवर चढतो, रस्ता ओलांडताना डावी-उजवीकडे बघतो, अन् खाणावळीत जेवताना बटाटे अन् झुरळांच्या भाजीतले फक्त बटाटे खातो. इतकेच नाहीतर सांगायला लाज वाटते पण आपले पाकीट मारले जावे एवढी साधी महत्त्वाकांक्षादेखील माझ्यात नाही,–शेम, शेम !



# १६




वि. स. वाळिंबे

क्रॅको येथील कामकाज आटोपल्यानंतर १९१३ च्या फेब्रुवारीमध्ये स्टॅलिन पीटर्सबर्ग येथे राहावयास आला. सैबेरियातील हद्दपारीची शिक्षा चुकवून तो क्रॅको येथे गेला असल्यामुळे त्याला पीटर्सबर्गमध्ये गुप्त रीतीने वावरावे लागले. या काळात त्याने लेनिनच्या आदेशानुसार 'मार्क्सवाद आणि राष्ट्रीय प्रश्न' या पुस्तकाचे लेखन पुरे केले.

'प्रावदा' पत्राच्या मदतीसाठी पीटर्सबर्गमध्ये वारंवार अनेक कार्यक्रम होत असत. असाच एकदा नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असताना त्याला हजर राहण्याचे स्टॅलिनने ठरविले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पीटर्सबर्गमधील भूमिगत कार्यकर्त्यांना परस्परांशी चर्चा करण्याची संधी मिळे. मुख्यत: तो हेतू मनात बाळगूनच स्टॅलिन या कार्यक्रमाला गेला होता. परंतु तेथे बरेच गुप्त पोलिस हिंडत असल्याचे दिसून येताच तो वेषांतर करण्यासाठी व्यासपीठामागच्या खोलीत शिरला. स्टॅलिन तेथून कदाचित पळून जाईल या भीतीने पोलिसही त्याच्या मागोमाग त्या खोलीत शिरले. त्यातील एकाने स्टॅलिनचा हात पकडत म्हटले, 'जुगाशाव्हिली, अखेर तुम्ही आमच्या हाती

*'ज्या क्षणी लेनिन विजयी होईल, त्याच क्षणी तो क्रांतीचे उद्दिष्ट स्वतःच्या पायांखाली तुडवील. राज्यसत्तेवर तो एवढी पकड ठेवील, की तिच्याखाली क्रांती गुदमरून जाईल.'*

—चार्ल्स रॅपापोर्ट

लागलात तर!'

'तुमचा काही तरी गैरसमज झालेला दिसतोय. मी जुगाशाव्हिली नव्हे. माझे नाव इन्हानोव्ह आहे.'

'या असल्या भाकडकथा तुम्ही तुमच्या आजीला सांगा.' आवाज उंचावत पोलिस म्हणाला.

स्टॅलिन काही दिवस पीटर्सबर्गच्या तुरुंगात ठेवल्यानंतर पोलिसांनी पुन्हा त्याची सैबेरियात रवानगी केली. राज्यक्रांती होईपर्यंत स्टॅलिन सैबेरियातच होता.

या नृत्याच्या कार्यक्रमाच्या वेळी स्टॅलिनप्रमाणे इतरही अनेक भूमिगत कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली. पक्षाच्या वरिष्ठ समितीतील एखादा सभासद पोलिसांना सामील झाला असावा आणि त्यामुळेच या कार्यक्रमाला कोण कोण येणार आहे याची पोलिसांना बातमी लागली असावी असे जो तो म्हणू लागला. अनेक बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांना मॅलिनोव्हस्कीचा संशय येत होता. परंतु तो लेनिनच्या खास मर्जीतील असल्यामुळे त्याचे नाव उच्चारण्याचे कोणीच धाडस केले नाही.

लेनिनने ऑगस्टमध्ये गॅलिशियातील झाकोपाने येथे पुन्हा बोल्शेव्हिक गटाच्या मध्यवर्ती समितीची बैठक बोलविली. तिला झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह, ट्रोयानोव्हस्की, शॉटमन, गॅनेटस्की, मॅलिनोव्हस्कीप्रभृति बावीस सदस्य हजर होते. या बावीस सदस्यांतील पाचजण सरकारी हेर म्हणून काम करीत होते हे गुपित पुढे अनेक वर्षांनी उजेडात आले. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक या दोन गटांत विभागणी होऊन बरेच दिवस झाले असले तरी ड्युमामध्ये हे दोन्ही गट एक पक्ष म्हणूनच अद्यापि वावरत होते. परंतु आता बोल्शेव्हिकांनी मेन्शेव्हिकांशी कोणत्याही क्षेत्रात सहकार्य करता कामा नये असे लेनिनने या बैठकीत सुचविले. बोल्शेव्हिक गटाने आपले स्वतंत्र संसदीय कार्य मॅलिनोव्हस्कीच्या मार्गदर्शनाखाली सुरू करावे, अशीही त्याने सूचना केली. ड्युमामध्ये बोल्शेव्हिक गटाचे सहा व मेन्शव्हिक गटाचे सात सदस्य होते. झाकोपाने येथील बैठकीनंतर हे सहा बोल्शेव्हिक सदस्य ड्युमामध्ये स्वतंत्र गट म्हणून मेन्शेव्हिकांपासून दूर बसू लागले. अशा रीतीने

बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक यांची कायमची ताटातूट केल्यानंतर 'प्रावदा'च्या स्तंभातून पुन्हा एकदा मेन्शेव्हिकांविरुद्ध जोराची प्रचार-मोहीम सुरू झाली. लेनिन, झिनोव्हेव्ह आणि मॅलिनोव्हस्की यांचे लिखाण तर फारच भडक होते. मेन्शेव्हिक कार्यकर्ते झार राजवटीपुढे नमते घेऊन कामगारांचा विश्वासघात करीत आहेत हा लेनिनचा ठरीव आरोप होता. निरनिराळ्या निमित्ताने हाच आरोप घोळवला जाई. ड्युमामध्ये भाषण करताना मॅलिनोव्हस्की झारशाहीपेक्षा कॅडेट आणि मेन्शेव्हिक यांच्यावर टीकेचा गदारोळ उठवीत असे.

लेनिनच्या या प्रचार-तंत्राला हळूहळू यश येऊ लागले. पीटर्सबर्ग, मॉस्को आदी प्रमुख शहरांतील कामगार संघटना आपल्या ताब्यात घेण्याचा बोल्शेव्हिक गटाचा प्रयत्न यशस्वी होत होता. या यशावर मॅलिनोव्हस्कीचे समाधान होणारे नव्हते. तो मेन्शेव्हिकासंबंधी अनेक खऱ्याखोट्या बातम्या 'ओखराना' या गुप्त सरकारी पोलिस संघटनेला कळवीत असे. या बातम्यांच्या आधारे मेन्शेव्हिकांची धरपकड सुरू झाली की मॅलिनोव्हस्की खूष होई. कसेही करून प्रथम मेन्शेव्हिकांना बदनाम केले पाहिजे हे लेनिनचे काळातील धोरणाचे प्रमुख सूत्र होते आणि ते कार्य मॅलिनोव्हस्की मोठ्या हुशारीने पार पाडीत असल्यामुळे लेनिनची त्याच्यावर मर्जी होती. लेनिनशी चर्चा करण्यासाठी मॅलिनोव्हस्की वारंवार क्रॅको येथे जाऊन येत असे.

१९१४ च्या एप्रिलमध्ये झारने कोकोव्हत्सेव्ह याच्या जागी प्रधानमंत्री म्हणून गोरेमिकीन याची नेमणूक केली. रशियातील क्रांतिकारक चळवळ संपूर्णपणे नष्ट करण्याचा झारचा आदेश घेऊनच गोरेमिकीन अधिकारावर आला होता. गोरेमिकीनचे हे स्वरूप ड्युमा सदस्यांच्या ध्यानात आल्यानंतर ड्युमाच्या बैठकीत त्याला वाढता विरोध होऊ लागला. एकदा तो कामगारांबाबतचे सरकारी धोरण विशद करण्यासाठी बोलावयास उभा राहिला असताना डाव्या पक्षांच्या सदस्यांनी टेबलांवर मुठी आपटून आणि घोषणांचा गजर करून त्याला बोलू दिले नाही. सभापतीने शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु तरीही सभागृहात शांतता प्रस्थापित होत नाही हे आढळून येताच सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या व अॅलेक्झांडर केरेन्स्की याच्या ट्रुडोव्हिकी गटाच्या सदस्यांना पंधरा दिवस सभागृहात न येण्यास बंदी करावी अशा आशयाचा प्रस्ताव सरकारतर्फे मांडण्यात आला व तो मंजूरही झाला.

पंधरा दिवसांची मुदत संपल्यानंतर ७ मे १९१४ रोजी अॅलेक्झांडर केरेन्स्की याने सर्व डाव्या सभासदांच्या वतीने सरकारी कृत्याचा निषेध करणारे निवेदन वाचून दाखविण्यास प्रारंभ केला. सभापतीच्या विरोधाला न जुमानता केरेन्स्की याने वाचन पुरे केले. त्यानंतर मॅलिनोव्हस्की बोलावयास उभा राहिला. सभापतीने त्याला खाली बसावयास सांगितले. तरीही त्याचे भाषण चालूच होते. शेवटी

सभापतीने सार्जंटाला बोलावून त्याच्याकरवी मॅलिनोव्हस्कीला खाली बसावयास लावले. या प्रकारामुळे सर्व डाव्या सदस्यांनी ड्युमाचा राजीनामा द्यावा अशी मॅलिनोव्हस्कीने मागणी केली. परंतु त्याची ही सूचना इतर गटांना पसंत पडली नाही. अशा वेळी आपण माघार घेतली तर आपले हसे होईल, शिवाय मेन्शेव्हिकांना बदनाम करण्याची आयती चालून आलेली संधी वाया जाईल हे ध्यानात घेऊन मॅलिनोव्हस्की एकटाच सभापतीच्या खोलीत गेला. सभापतीच्या हातात एक पत्र देत तो म्हणाला, ' रोडॅझिॲन्को, मी आपला निरोप घ्यायला आलो आहे. "

" म्हणजे तुझा काय विचार आहे ?"

" हे पत्र वाचल्यानंतर सारे काही समजेल."

एवढे बोलून मॅलिनोव्हस्की घरी परतला. दुपारी ड्युमाची बैठक सुरू झाली तेव्हा मॅलिनोव्हस्कीने ड्युमा-सदस्यत्वाचा राजीनामा सादर केल्याची बातमी रोडॅझिॲन्को याने जाहीर केली तेव्हा सभागृहात एकच खळबळ उडाली. या वेळी बॅडायेव्ह हा एकटाच बोल्शेव्हिक सदस्य सभागृहात हजर होता. तो सभागृहाबाहेर आला आणि त्याने 'प्रावदा'ला फोन करून मॅलिनोव्हस्कीच्या राजीनाम्याची बातमी सांगितली. 'प्रावदा'च्या संपादकवर्याला आश्चर्याचा धक्काच बसला.

बॅडायेव्ह म्हणाला, ' आपण राजीनामा देणार आहोत हे मॅलिनोव्हस्कीने आपल्या पक्षाच्या सदस्यानांही कळविले नाही. मॅलिनोव्हस्कीने पक्षशिस्तीचा भंग केला असल्यामुळे त्याने आपल्या वर्तनाचा खुलासा केलाच पाहिजे. "

बॅडायेव्हच्या सूचनेनुसार पेट्रोव्हस्की हा दुसरा एका बोल्शेव्हिक सदस्य मॅलिनोव्हस्कीच्या घरी गेला. पेट्रोव्हस्की आता येथे कशासाठी आला आहे हे मॅलिनोव्हस्कीने जाणले. तो पेट्रोव्हस्कीवर गुरगुरला, ' मला त्रास देऊ नकोस. माझी मनःस्थिती आता ठीक नाही. '

' पण तू ड्युमाचा राजीनामा दिला आहेस ही गोष्ट खरी आहे का ? '

' एकदा सांगितले ना ! मला आता काहीही विचारू नकोस म्हणून. '

' हे बघ, ' पेट्रोव्हस्की आवाज चढवीत म्हणाला, ' मला तुझ्या मनःस्थितीशी काहीही कर्तव्य नाही. पक्षाची परवानगी न घेता राजीनामा देऊन तू तुझ्या सहकाऱ्यांचा विश्वासघात केला आहेस. म्हणून तू ताबडतोब पक्ष-कचेरीत येऊन आपल्या वर्तनाचा खुलासा केला पाहिजेस. हा पक्षाचा आदेश तुझ्या कानावर घालण्यासाठीच मी येथे आलेलो आहे. '

' मी आता कोणालाही खुलासा करण्याच्या मनःस्थितीत नाही. '

' याचा अर्थ असा की पक्षाचा हा आदेश मानण्याचीही तुझी तयारी नाही. '

' तुम्हांला वाटेल तो याचा अर्थ समजा. पण मी खुलासा मुळीच करणार नाही हे मात्र नक्की. '

पेट्रोव्हस्की पक्ष-कचेरीत परतला आणि मॅलिनोव्हस्कीशी झालेला संवाद सह-

कार्यांना कथन केला. वॅंडायेव्ह म्हणाला, ' पेट्रोव्हस्की, तू परत त्याच्या घरी जा आणि त्याला सांग की तू जर येथे ताबडतोब आला नाहीस तर तुझ्याविरुद्ध आम्हांस कडक उपाय योजावे लागतील. '

पुन्हा पेट्रोव्हस्की दिसताच मॅलिनोव्हस्की संतापला. तो म्हणाला, ' मी मघाशी तुला सांगितले ना की मी येणार नाही म्हणून—मग तू पुन्हा इथे कशाला आलास ? मी पक्ष-कचेरीत खुलाशासाठी येणार नाही. या माझ्या निर्णयात बदलही होणार नाही. '

' मग आम्हांला तुझ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी लागेल. '

पेट्रोव्हस्कीचे हे शब्द ऐकताच मॅलिनोव्हस्की चवताळून म्हणाला, ' तुम्हांला काय पाहिजे ते करा. मी मुळीच खुलासा करणार नाही. मला याबाबत आता पुन्हा एक शब्ददेखील विचारू नकोस. '

' तुझा हा अंतिम निर्णय समजायचा का ? '

' हो, हो. एकच गोष्ट किती वेळा पुनः पुन्हा सांगायची ! मी आज रात्रीच देश सोडून जात आहे. विश्वास बसत नसेल तर हा बघ पासपोर्ट. '

मॅलिनोव्हस्की-प्रकरणाने बोल्शेव्हिक गटात फूट पडल्याचे आढळून आले. मेन्शेव्हिकांनी मॅलिनोव्हस्कीसंबंधाने अधिक माहिती मिळविण्यास प्रारंभ केला तेव्हा तो ' ओखराना 'चा हस्तक असण्याचे निर्विवाद रीतीने सिद्ध झाले. मेन्शेव्हिकांनी मॅलिनोव्हस्कीच्या वास्तव रूपाचे दर्शन घडविताच लेनिन त्याच्यावर खवळला नसता तरच नवल. बोल्शेव्हिक पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसण्यासाठीच मेन्शेव्हिक मॅलिनोव्हस्कीवर खोटेनाटे आरोप करीत आहेत अशा आशयाचे लेनिनचे पत्र ' प्रावदा'मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. या पत्रकावर झिनोव्हेव्हचीही स्वाक्षरी होती. लेनिनचा कांगावा सुरू झाल्यानंतर मार्तोव्हसारखा मेन्शेव्हिक नेता स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. ' आम्ही मॅलिनोव्हस्कीवर केलेले आरोप खोटे आहेत असा जर लेनिनचा दावा असेल तर त्याने मॅलिनोव्हस्कीच्या वर्तनाची चौकशी करण्यास संमती द्यावी ' असे मार्तोव्हने जाहीर आव्हान दिले. परंतु लेनिनने त्या आव्हानाकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष केले.

मॅलिनोव्हस्की लेनिनची भेट घेण्यासाठी पीटर्सबर्गहून थेट प्रोनिओ येथे गेला होता. त्या दोघांत काय चर्चा झाली हे त्या वेळी प्रसिद्ध होऊ शकले नाही. परंतु मॅलिनोव्हस्कीचे वर्तन लेनिनला पसंत पडले नसावे असा प्रोनिओ येथे लेनिनसमवेत राहत असलेल्या बुखारिनने निष्कर्ष काढला आहे. बुखारिन लिहितो, ' मॅलिनोव्हस्की ज्या दिवशी प्रोनिओ येथे आला त्या दिवशी मी वरच्या मजल्यावरच्या खोलीत झोपलो होतो. पण काही केल्या मला बराच वेळ झोप येईना. आपल्या पक्षाचा एक प्रमुख कार्यकर्ता सरकारी हेर आहे हे कळल्यापासून माझी बेचैनी वाढली होती.

शेजारच्याच खोलीत लेनिन झोपला होता. त्यालाही झोप येत नसावी हे मी ताडले. तो अधूनमधून गच्चीवर जाई व थोड्या वेळाने पुन्हा परत येई. मध्येच त्याने एकदा चहाही करून घेतला. मला केवळ आवाजावरून हे समजत होते. ती सारी रात्र त्याने विचार करण्यातच घालविली होती. सकाळी मी खाली गेलो तेव्हा लेनिन आधीच तयार होऊन बसला होता. ' रात्री चांगली झोप आली होती ना ! ' त्याने मला विचारले. एवढे बोलून तो नेहमीप्रमाणे हसला. विषय बदलण्यासाठी तो म्हणाला, ' चहा घेणार ना ? आणि पाव ? तुझे चहापान आटोपले की आपण फिरायला जाऊ. ' काल रात्री जणू काही घडलेच नव्हते अशा थाटात तो वावरत होता. आपल्या पोलादी इच्छाशक्तीच्या बळावर मनातला संघर्ष चेहऱ्यावर दिसणार नाही याची काळजी घेण्याच्या कलेत लेनिनइतका वाकबगार माणूस मी पाहिलेला नाही. मॅलिनोव्हस्की-प्रकरणामुळे काल रात्रभर तो तळमळला होता. परंतु त्यासंबंधी त्याने दिवसभरात अवाक्षरही काढले नाही. लेनिनने एकदा निर्णय केला की त्यापासून त्याला किंचितही दूर करणे सर्वस्वी अशक्य होते. '

मॅलिनोव्हस्कीच्या वर्तनामुळे बोल्शेव्हिक गटामध्ये निर्माण झालेले वादळ कसे शांत करावे याचा लेनिनला विचार करणे भाग होते. शेवटी त्याने मॅलिनोव्हस्कीच्या सहीनेच एक पत्र प्रसिद्ध करण्याचे ठरविले. २५ मे १९१४ च्या ' प्रावदा 'अंकात मॅलिनोव्हस्कीच्या सहीने पुढील पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. ' काही खाजगी कारणामुळे मी तूर्त राजकीय कार्य स्थगित केले असले तरी मी कट्टर बोल्शेव्हिकच आहे, मार्तोव्हने माझी बदनामी करण्याचे कार्य यापुढेही चालू ठेवले तर मी त्याच्यावर खटला भरण्याचे ठरविले आहे. '

मॅलिनोव्हस्कीच्या पत्रकाबरोबरच लेनिन, झिनोव्हेव्ह व गॅनटेस्की यांच्या सह्या असलेली एक तारही ' प्रावदा 'च्या कचेरीत येऊन पोचली होती. त्या तारेत म्हटले होते—' खोट्या बातम्या प्रसिद्ध करून बोल्शेव्हिकांना बदनाम करण्याची मार्तोव्ह आणि डॅन यांची खोड सर्वांना माहीतच आहे. त्यांनी मॅलिनोव्हस्कीवरचे आरोप आपल्या सहीनिशी प्रसिद्ध करावेत अशी आम्ही मागणी करतो. म्हणजे मग आम्हांला त्यांच्याविरुद्ध कायदेशीर उपाययोजना करून आरोपातील खोटेपणा आम्हांस सिद्ध करता येईल. मार्तोव्हने ज्या अफवा पसरविल्या आहेत त्यांची आम्ही चौकशी केली व मॅलिनोव्हस्की हा एक सामाजिक राजकीय कार्यकर्ता आहे अशी आमची खात्री झाली आहे. '

लेनिनची ही तार प्रसिद्ध करून तिच्याखाली ' प्रावदा 'ने संपादकीय टीप लिहिली— ' मार्तोव्ह आणि डॅन यांच्यासारखे कामगारद्रोही लोक बोल्शेव्हिक पक्षामध्ये फूट पडावी म्हणून मुद्दाम खोटानाटा प्रचार करीत आहेत. त्यांच्या या प्रचाराला न फसता बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी आपापसांतील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने कार्यास लागावे असे आमचे आवाहन आहे. कार्यकर्त्यांनी आता आपापसांत मॅलिनोव्हस्की-प्रकरणाची

कुजबूज करण्याचे कारण उरलेले नाही. मॅलिनोव्हस्कीच्या संबंधात खुद्द लेनिननेच आपला अंतिम निर्णय आता जाहीर केलेला आहे. '

एवढे करूनच लेनिन स्वस्थ बसला नाही. महायुद्धामध्ये मॅलिनोव्हस्की ठार झाल्याची बातमी त्याने १९१५ मध्ये प्रसिद्ध केली. इतकेच नव्हेतर त्याच्या अकाली निधनाबद्दल दुःख व्यक्त करून मॅलिनोव्हस्की हा एक थोर कामगार नेता होता अशी त्याला जाहीर श्रद्धांजलीही वाहिली. परंतु ही बातमी सर्वथैव खोटी होती. मॅलिनोव्हस्की-प्रकरणाची चर्चा कायमची बंद व्हावी यासाठी लेनिनने तो मार्ग अवलंबला होता.

लेनिनने मॅलिनोव्हस्कीची बाजू घेतली ही गोष्ट कोणालाच आवडली नाही. जर्मनी, फ्रान्स आदी राष्ट्रांतील समाजवाद्यांनीही याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. 'झारशाहीमध्ये स्टोलिपिनसारख्या एकतंत्री प्रधानमंत्र्याचे जे स्थान आहे तेच समाजवादी चळवळीमध्ये लेनिनचे आहे' असे चार्ल्स रॅपापोर्ट या प्रसिद्ध फ्रेंच समाजवादी नेत्याने म्हटले आहे. लेनिनच्या हुकूमशाही स्वभावामुळे कोणताच पक्ष अस्तित्वात राहणार नाही या आपल्या विधानाचे विवरण करताना रॅपापोर्ट म्हणतो :

> **लेनिनच्या कर्तृत्वाबद्दल कोणाचेच दुमत होणार नाही. आम्हीही त्याच्या कर्तृत्वाची मोकळ्या मनाने प्रशंसा केली आहे. पोलादी मनोबलाच्या या नेत्याजवळ अनन्यसाधारण असे संघटनाचातुर्य आहे ही गोष्ट तर खरीच. परंतु त्याबरोबरच आपण एकटेच खरे समाजवादी आहोत असेही तो प्रामाणिकपणे मानतो. जो कोणी त्याला विरोध करतो तो लेनिनचा कायमचा शत्रू होतो. विरोधकांना देहान्त शासनाशिवाय दुसरे शासन नाही असेच तो मानतो. जो कोणी त्याच्याविरुद्ध मतप्रदर्शन करतो त्याच्याशी लेनिन एकदम युद्धच पुकारतो. त्याचा परस्पर-विचारविनिमयावर विश्वासच नाही. विरोधकांना निपटून काढण्यासाठी 'शस्त्रक्रिया' हा एकच उपाय आहे अशी त्याची श्रद्धा आहे. लेनिन हा समाजवादी झार असून त्याच्या अंमलाखाली कोणताही राजकीय पक्ष नांदू शकणे सर्वस्वी अशक्य आहे. तो स्वतःला सर्वश्रेष्ठ मार्क्सवादी समजतो. पण खरे म्हणजे तो केवळ अतीव सामर्थ्यशाली असा साहसवादी आहे. हेच त्याचे खरे स्वरूप आहे मी काही लेनिनच्या स्पर्धक गटातील नाही. परंतु गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवाने माझी अशी खात्री झाली आहे की लेनिन ज्या क्षणी विजयी होईल त्याच क्षणी ज्या क्रांतीचा आज तो पुकारा करीत आहे त्या क्रांतीचे उद्दिष्ट तो स्वतःच पायाखाली तुडवील. राजसत्तेवर तो आपली एवढी पकड ठेवील की तिच्याखाली क्रांती गुदमरून जाईल.**

ट्रॉ मामधील मेन्शेव्हिक गटाचा नेता श्खेईड्झस याला याच सुमारास लिहिलेल्या पत्रात ट्रॉटस्की म्हणतो :

'पक्षांतर्गत कुरबुरी कायम ठेवण्यासाठी लेनिन रशियन कामगार–चळवळीतील मागासलेपणाचा जो फायदा उठवीत आहे तो संतापजनक आहे. धादांत खोटया विधानावर आणि पक्ष प्रचारावरच लेनिनवादाची इमारत उभी आहे. कामगार-क्रांतीचे विघटन होण्याची विषारी बीजेही लेनिनवादाच्या पोटातच सामावलेली आहेत.'

ब्रुसेल्स येथे १९१४ च्या जुलैमध्ये आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळीचे खास अधिवेशन बोलावण्यात आले. रशियातील समाजवादी चळवळीत कसा एकोपा साधता येईल हा या परिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेवरील एक महत्त्वाचा विषय होता. त्यामुळे ट्रॉटस्की, प्लेखानोव्ह, अॅक्सेलरॉड, मार्तोव्ह, अॅलेक्सिन्स्की, गॅटेनस्को, रोझा लक्झेंबर्ग आदी प्रमुख रशियन नेते या परिषदेसाठी ब्रुसेल्सला गेले. रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षामध्ये गेली बरीच वर्षे जी फूट पडली आहे तिच्याबद्दल या परिषदेत चिंता व्यक्त करण्यात आली. लेनिनच्या आक्रमक वृत्तीमुळेच ही फूट पडली आहे असा या परिषदेत निष्कर्ष काढण्यात आला तरीही रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कारभारात हस्तक्षेप न करण्याची दक्षता परिषदेने घतली होती.

या परिषदेतील चर्चेचा सूर अगोदरच माहीत असल्यामुळे लेनिन आणि झिनोव्हेव्ह व कामेनेव्ह हे त्याचे दोन निकटवर्ती सहकारी या परिषदेला हजर राहिले नाहीत. त्याऐवजी आपली बाजू मांडण्यासाठी लेनिनने इनेसा आर्मंद हिला ब्रुसेल्सला धाडले. इनेसाचे भाषण स्वत: लेनिननेच लिहून दिले होते. इतकेच नव्हे तर चर्चेच्या वेळी आपली बाजूच कशी बरोबर आहे हे सिद्ध करण्यासाठी कोणते मुद्दे मांडावयाचे याचे एक टिपणही लेनिनने इनेसाजवळ दिले होते. एका आंतरराष्ट्रीय परिषदेच्या कामकाजात भाग घेण्यासाठी आपल्या प्रेयसीची निवड करण्याचे लेनिनचे धोरण अनेक बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांना संमत नव्हते. ते यासंबंधी आपापसांत कुजबुजू लागले. ही कुजबूज इनेसाच्या कानांवर येताच ती खट्टू झाली. इनेसाची समजूत घालण्यासाठी तो म्हणाला, 'सगळे लोक मूर्ख आहेत. अगदी महामूर्ख आहेत. तुला आपली बाजू मांडण्याचे कार्य जमणार नाही ही तक्रार निखालस खोटी आहे. तुझे भाषाप्रभुत्व मला माहीत आहे ना ! तू आपल्या आकर्षक वक्तृत्वाच्या बळावर विरोधकांना सहज नामोहरम करू शकशील. कोणी तुझ्या भाषणात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला तर तू त्याला दाद देऊ नकोस 'एकजुटीसाठी तुमच्या नेमक्या सूचना काय आहेत त्या मला सांगा' असा तू आग्रह धर. शेवटी ते त्यांच्या मार्गाने जाणार आहेत आणि आपण आपल्या. परंतु परिषदेत काय घडते हे आपल्याला समजून घेतले पाहिजे. मग आपण आपले धोरण ठरवू. ''

लेनिनने लिहून दिलेले भाषण इनेसाने परिषदेत वाचून दाखविले. बोल्शेव्हिक सेंटरची मध्यवर्ती समिती हीच सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचीही मध्यवर्ती समिती आहे असे जर इतर गट मान्य करणार असतील तरच पक्षात एकजूट होऊ शकेल हा या भाषणातील एकमेव मुद्दा होता. तिला उत्तर देताना प्लेखानोव्ह म्हणाला, 'आधीच लेनिनने पक्षाची मालमत्ता बोल्शेव्हिक सेंटरसाठी स्वत:च्या ताब्यात घेतली आहे. पक्षावर आपल्या एकट्याचेच नियंत्रण राहिले पाहिजे हा त्याचा प्रारंभापासूनचा हट्ट आहे. हा हट्ट जर तो बाजूला सारणार असेल तर पक्षात पुन्हा एकजूट होईल. एरवी नाही.'

सोशल डेमोक्रॅटिक पक्षातील लेनिनवादी आणि लेनिनविरोधक गटांमध्ये समझोता होण्याची मुळीच शक्यता दिसत नसतानाही हा प्रयत्न तेथेच थांबला जाऊ नये म्हणून ऑगस्टअखेरीस व्हिएन्नामध्ये भरणाऱ्या परिषदेने या फाटाफुटीचा फेरविचार व्हावा असा ठराव करून ब्रुसेल्स परिषदेने या विषयावर पडदा टाकला. परंतु युद्धामुळे व्हिएन्ना परिषद भरू शकली नाही.

सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये लेनिन जरी लोकप्रिय नसला तरी पीटर्सबर्ग, मॉस्को आदी प्रमुख शहरांतील कामगार मात्र त्यालाच मानत होते. पाश्चात्त्य मार्क्सवाद्यांच्या शब्दजंजाळापेक्षा किंवा मेन्शेव्हिकांच्या मवाळ धोरणापेक्षा साध्यासुध्या भाषेतले लेनिनचे क्रांतीचे आवाहन कामगारांच्या हृदयापर्यंत जाऊन पोचत होते. आपले हे सामर्थ्य माहीत असल्यामुळेच यापुढे आंतरराष्ट्रीय समाजवाद्यांच्या नादी न लागता बोल्शेव्हिकांचीच स्वतंत्र परिषद भरविण्याचे लेनिनने ठरविले. या परिषदेच्या कामकाजाची रूपरेषा ठरविण्यासाठी बोल्शेव्हिक सेंटरच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य क्रॅको येथे जमले. परंतु त्याच सुमारास युरोपात महायुद्धाचा भडका उडाल्यामुळे लेनिनला हा बेत रद्द करावा लागला.

१९०४ च्या रूसो-जपानी युद्धामुळेच १९०५ ची क्रांती होऊ शकली हे लेनिनला माहीत होते. या पहिल्या क्रांतीने आपले मर्यादित उद्दिष्ट सफल केले होते. जनमानसात रुजलेली झारशाहीबद्दलची भीतीची भावना नष्ट करून या जुलमी राजवटीविरुद्धही उभे राहता येते हे या क्रांतीने दाखवून दिले होते. झारशाहीविरुद्ध खदखदणाऱ्या असंतोषाचा फायदा घेऊन अखेरीस ही राजवट उलटून पाडावयाची असेल तर आणखी एका क्रांतीची गरज आहे व युद्धाशिवाय तशी संधी निर्माण होणार नाही हे जाणून लेनिन नेहमी म्हणत असे- 'युद्ध ही क्रांतीची प्रस्तावना ठरते.' १९१३ मध्ये मॅक्झिम गॉर्कीला लिहिलेल्या पत्रात लेनिन म्हणतो, 'ऑस्ट्रिया आणि रशिया यांच्यांत युद्ध सुरू झाले तर आपल्याला नक्कीच क्रांती घडवून आणता येईल. पण ऑस्ट्रियाचा फ्रान्झ जोसेफ आणि रशियाचा निकोलस आपल्याला

ही संधी आणून देतील अशी आज तरी शक्यता दिसत नाही.'

परंतु वर्षभरातच तसे घडून आले. जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध पुकारल्याची बातमी क्रॅको येथे पोचली तेव्हा लेनिनने झिनोव्हेव्हला पहिला प्रश्न विचारला, 'आता सोशॅलिस्ट इंटरनॅशनल कोणती भूमिका घेईल असे तुला वाटते ?'

'जर्मनीतील सोशल डेमोक्रॅट्स कैसरविरुद्ध मुळीच आवाज काढणार नाही. ते नुसते गप्प बसतील.'

'छे:,' लेनिन उत्तरला, 'ते इतके भ्याड आहेत असे मला मुळीच वाटत नाही. ते युद्धाला नक्कीच विरोध करतील. आपण जर युद्धाविरुद्ध आवाज उठविला नाही तर कामगारवर्ग आपल्यावर चिडेल या भीतीने तरी त्यांना युद्धाला विरोध केलाच पाहिजे.'

परंतु लेनिन आणि झिनोव्हेव्ह या दोघांचेही अंदाज साफ चुकले. युरोपमधील सर्वच सोशल डेमोक्रॅटिक पक्षांचा लष्करवादाला विरोध असला तरी एकदा युद्ध सुरू झाल्यानंतर आता त्याला प्रतिबंध करणे इष्ट होणार नाही असेच पश्चिम युरोपातील समाजवादी पक्षांचे मत पडले. त्यांचे म्हणणे असे होते की 'युद्ध सुरू असताना कामगारांनी संप केला तर त्यामुळे केवळ फ्रान्स-जर्मनीसारख्या पुढारलेल्या राष्ट्रांचेच नुकसान होणार आहे. रशियासारख्या मागासलेल्या राष्ट्राला औद्योगिक संपाची फारशी झळ लागणार नाही, या कारणामुळेच युद्ध सुरू झाल्यानंतर संपाचे हत्यार उचलण्यास जर्मनीतील समाजवाद्यांचा विरोध होता. युद्धाच्या प्रारंभीच्या कालात ज्याप्रमाणे कामगारांचा संप घडवून आणणे अनिष्ट आहे, त्याचप्रमाणे सैनिकांना बंडास प्रवृत्त करणेही इष्ट ठरणार नाही असे त्यांचे मत होते. त्यांच्या या मताला रोझा लक्झेंबर्गसारख्या कट्टर डाव्या कार्यकर्तीचाही पाठिंबा होता. आतापर्यंत युद्धाला तीव्र विरोध करणाऱ्या कार्ल लिएवक्नेख्टसारख्या नेत्यानेही हेच समर्थन केल्याची बातमी लेनिनने जेव्हा वर्तमानपत्रात वाचली तेव्हा ते वर्तमानपत्र दूर फेकीत तो चवताळून म्हणाला, 'अशक्य! धादांत खोटी बातमी आहे ही.'

परंतु पश्चिम युरोपीय समाजवाद्यांनी आपापल्या राष्ट्रांच्या युद्धभूमिकेला पाठिंबा दिला असल्याबद्दल लेनिनची जेव्हा खात्री पटली तेव्हा तो हताश होऊन म्हणाला, 'म्हणजे आता सोशॅलिस्ट इंटरनॅशनल ही संघटना मेली आहे असेच म्हटले पाहिजे.'

१ ऑगस्ट रोजी युद्ध सुरू झाल्यापासून ऑस्ट्रियन पोलिस गॅलिशियामध्ये लपलेल्या शत्रु-हेरांचा शोध करू लागले. ७ ऑगस्ट रोजी लेनिनने गॅनेटस्कीला बोलावून घेऊन सांगितले, 'व्हिएन्नाहून आलेल्या ऑस्ट्रियन पोलिसांनी आताच माझ्या घराची झडती घेतली. उद्या सकाळी त्यांनी मला चौकीवर बोलावले आहे. तेथून जबानी-

साठी ते मला नोव्होतार्ग येथे नेणार आहेत. पण झडती घेणारे हे पोलिस महामूर्ख असले पाहिजेत. कारण त्यांनी माझ्या जवळच्या पत्रव्यवहाराला हातदेखील लावला नाही. त्या पत्रव्यवहारात अनेक कार्यकर्त्यांचे पत्ते व त्यांच्या सध्याच्या हालचाली यांसंबंधी बरीच माहिती होती. त्याऐवजी त्या मूर्खांनी माझे एक हस्तलिखित जप्त केले. त्यात मी शेतकऱ्यांच्या परिस्थितीविषयी काही आकडेवारी लिहिली होती. तो काहीतरी सांकेतिक स्वरूपाचा मजकूर असावा अशी त्यांची कल्पना झालेली दिसते. आता आपण काय करावे असे तुला वाटते ?. उद्या नोव्होतार्ग येथे नेऊन पोलिसानी मला अटक केली तर ? हे युद्ध आहे. कोणाला कशाचा संशय येईल हे सांगता येत नाही. रशियन हेर म्हणून मला अटक करण्यासही हे मूर्ख कमी करणार नाहीत.'

गॅनेटस्की म्हणाला, 'तू झारशाहीचा सर्वांत कट्टर शत्रू आहेस हे क्रॅकोमधल्या प्रत्येक पोलिसाला ठाऊक आहे. परंतु बाहेरून आलेले पोलिस काय करतील हे मात्र सांगता येणार नाही.'

शेवटी लेनिनने क्रॅकोमधल्या पोलिसप्रमुखाला पत्र धाडून खुलासा करावा असे गॅनेटस्कीने सुचविले. त्यानुसार लेनिनने पोलिसप्रमुखाला कळविले– 'मी गेली दोन वर्षे क्रॅको येथे राहत आहे. रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा निर्वासित कार्यकर्ता म्हणून मला येथे राहावयास यावे लागले. माझ्यासंबंधी पोलिसखात्याचा गैरसमज होऊ नये म्हणून मुद्दाम ही माहिती कळवीत आहे.'

हे पत्र पोचल्यानंतर लेनिनला पकडण्याची जरुरी नाही, असे क्रॅको येथील पोलिसप्रमुखाने वरिष्ठांना कळविले. परंतु तत्पूर्वीच लेनिन आणि झिनोव्हेव्ह यांना अटक करण्यात आली होती. आपल्याला अकारण पकडले असल्याची बातमी गॅनेटस्कीने तार करून व्हिक्टर अॅडलर या ऑस्ट्रियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्याला कळविले. अॅडलर ताबडतोब परराष्ट्रमंत्र्याच्या भेटीस निघाला.

**अॅडलर** : लेनिन झारशाहीचा शत्रू असल्यामुळे त्याला मोकळे ठेवणेच ऑस्ट्रिया आणि जर्मनी यांच्या हिताचे ठरणार आहे. कारण तो सतत रशियाविरुद्ध आणि रशियाच्या मित्रराष्ट्रांविरुद्ध प्रचार करीत राहील.

**परराष्ट्रमंत्री** : म्हणजे मग लेनिन मित्रराष्ट्रांचाही शत्रूच आहे तर !

**अॅडलर** : तुमच्यापेक्षाही अधिक कट्टर.

अॅडलरच्या प्रयत्नामुळे १९ ऑगस्ट १९१४ रोजी लेनिनची सुटका झाली. आता क्रॅको येथे राहण्यात काहीच स्वारस्य उरले नसल्यामुळे त्याने स्वित्झर्लंडला जाऊ देण्याची पोलिसांकडे परवानगी मागितली. ती परवानगी हाती येताच लेनिनने क्रॅकोहून जिनीव्हाकडे प्रयाण केले.

(क्रमश:)

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

दि. १६ ते २२ सप्टेंबर

श्री. गो. जोशी

सायनाचार्य,

**मेष :** सिंहस्थ पर्वकाल. २१ वर्षांनंतर लाभलेली ही संधी भाविकांना फलदायी होते की नाही हे निश्चित सांगता येणार नाही; पण मेष राशी व्यक्तींना मात्र हा पंचमातील सिंहस्थ-पर्वकाल अपेक्षेपेक्षाही अधिक कल्याणकारक असतो, हे अनेक वेळा निरपवादपणे सिद्ध झालेले आहे.

शैक्षणिक क्षेत्रात विक्रमी यश मिळवाल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात तर अनन्यसाधारण कार्य करून दाखविण्याची संधी लाभेल. राजकीय क्षेत्रात तुमच्याविना पान हलेनासे होईल.

अनपेक्षितपणे बढती लाभेल, आजवरच्या बऱ्याचशा असफल आशा-आकांक्षा या कालापासून सफल व्हाव्यात.

दि. १६ ते १९ या कालाची नोंद करा.

**वृषभ :** सिंह राशीतील गुरूमुळे तुमच्या राहणीत, आचार-विचारांत प्रचंड क्रांती घडून येईल. लवकरच स्थानांतर घडेल, नवे कार्यक्षेत्र हाती गवसेल, कर्तृत्व-संपन्न लोकांचे सहकार्य लाभेल. हे सारे घडत असताना सातव्या मंगळाची अनिष्टता-सतत टोचणी जाणवत राहील, व्यवसायातील सहजासहजी घडणाऱ्या गोष्टी रेंगाळत आहेत, असा अनुभव येऊ लागेल.

पण अशा साऱ्या अडचणींना आपण पुरून उराल असे बारीकसारीक प्रसंग आजवर आपण अनेक वेळा अनुभवले आणि ते सारे ठोकरून काढून आपण आपले अचाट कर्तृत्व जगाच्या निदर्शनास आणूनही दिलेले आहे.

दि. १८ ते २१ अपयशातूनही यश शोधण्यात यशस्वी ठराल.

**मिथुन :** गुरूची पराक्रमस्थानी उपस्थिती एवढ्या एकाच घटनेमुळे, त्याच्या अचाट कर्तृत्वाचे आपणांस दर्शन घडेल. या वेळी आपण कुठेही गेलात, काहीही केलेत तरी तिथे तुमचा सत्कार होईल आणि अपेक्षेपेक्षाही मोठे यश लाभेल.

उच्च वर्तुळातील अधिकाऱ्यांशी आपले संबंध जुळून येतील, महान् उद्योगपतींची कृपा लाभेल, त्यामुळे तुमचे अंगीकृत कार्य गती घेऊ लागेल.

तुमच्या जीवनातील हा एक यशस्वी पर्वकाळ ठरेल. हस्तकला, सौंदर्य प्रसाधने, कला-क्षेत्रे यांत सध्या आघाडीवर दिसू लागतील मिथुन राशी व्यक्तीच. या वेळी दूरचे स्थानांतर घडेल. आणि तेथे नाव घेण्यासारखे कार्य करून दाखवू शकाल.

दि. २० ते २२ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** चौथ्या मंगळाचा घिंगाणा थांबला आणि गुरू हवा तसा अनुकूल आला. आता तुमचे कशातही अडू नये. कुठेही नडू नये. तुमच्या कर्तृत्वाचा मुक्तसंचार दाही दिशांना सुरू होईल.

ग्रह प्रसन्न आहेत– परिश्रम करण्याचे व्रत निष्ठेने पाळलेत तर तुम्हांला या वेळी हवं ते–मागाल ते मिळेल.

या कालापासून धनोत्पादनाच्या नव्या मार्गाचा शोध लागेल, आणि लवकरच पैशाची कारंजीही तेथे उडायला लागतील. आता सारी विवंचना, याचना मिटतील.

कला-साहित्याच्या क्षेत्रांतील व्यक्तींना नवे आकर्षक करारमदार करण्याची संधी लाभेल आणि नोकरी धंद्यामध्येही कधी नव्हते एवढे यश मिळून जाईल.

दि. १८ ते २० या कालाची प्रामुख्याने नोंद करा.

**सिंह :** तुमच्या राशीत गुरूचे आगमन घडले (दि. १४) तेव्हाच त्याने तुम्हांला सांगून टाकले की, " महत्व, उच्चतम प्रतिष्ठा, नेत्रदीपक यश हे सारे शब्द तुम्हांसाठी–फक्त तुम्हा सिंहराशी व्यक्तीसाठीच–उपयोगात आणण्यात येतील. इतरांना ते शब्द वापरण्यास सक्त मनाई आहे.

या काली तुमच्यावर अनेक महान् जबाबदाऱ्या पडतील आणि त्या फक्त तुम्हीच यशस्वी करून दाखवू शकाल अशी समाजाला खात्री वाटू लागेल.

तुमच्या अचाट कर्तृत्वाचे याच वेळी जगाला दर्शन घडेल. शनिमंगळांनी तुमच्याशी असहकार पुकारला असला तरी तुमच्या प्रतिष्ठेला मुळीच बाध येऊ शकणार नाही.

दि. २० ते २२ पासून तुमचे जीवन गतिमान बनू लागेल.

**कन्या :** आजवर गुरूसारख्या एका महान ग्रहाची तुमच्यावर कृपा होती. आता तुम्हांला तुमच्या कर्तत्वावर, निर्धारावरच अवलंबून राहायला हवे. जातीने साऱ्या

कामात लक्ष घातलेत तरच यशाची आशा बाळगता येईल. आणि पराक्रमातील मंगळ ती आपली आशा सफल करायला कटिबद्ध आहेच.

तेव्हा गुरू अनुकूल नाही म्हणून मागे रेंगाळू नका–उगीच घोळ घालीत बसू नका. या वेळच्या सूर्य–हर्षल योगाच्या मनात तुम्हांला काही घवघवीत द्यायचे आहे, अविश्रांत परश्रिमाचे व्रत घेतलेत की, ते मिळालेच म्हणून समजा.

या आठवड्यात वरचेवर प्रवास घडेल, अनंत कामे हातावेगळी करावी लागतील आणि काही व्यक्तींचे आपल्या महान कार्याला सहकार्यही लाभेल.

१९ ते २१ अपेक्षित यश याच वेळी लाभावे.

**तूळ** : भारतातील आपल्या उज्ज्वल चारित्र्याने इतिहासातील एक नवे पान लिहिण्याचे भाग्य ज्या व्यक्तींना लाभले–अशा तेजस्वी व्यक्तींच्या यादीत तुमचे नाव आता पाहावयास मिळेल. अकराव्या गुरूची ही सारी किमया. माझ्या या म्हणण्याचा आपणांस प्रत्ययच घ्यायचा असेल तर १९५६–१९६४ या भूतकालाचे स्मरण करा.

व्यावसायिक क्षेत्र व्यापक बनेल. संपन्न लोकांचे हार्दिक सहकार्य लाभेल, सहज काही करायला जावे आणि ते घवघवीत यश घेऊन उठावे असा साक्षात्कार पदोपदी घडून यायला लागेल.

पण हे सारे याच आठवड्यात घडेल अशी सोईस्कर समजूत करून घेऊ नका. तुमच्या जीवनप्रवाहाचे वळण कसे आहे हे दाखवण्याचा माझा उद्देश आहे.

दि. १९ ते २१ या काळी अनुकूल कालाची लक्षणे दिसू लागतील.

**वृश्चिक** : मंगळ तुमच्या राशीत आला आहे म्हणून नाराज होऊ नका. तो ताण वाढवील, खूप परिश्रम करायला लावील पण असे अनन्यसाधारण यश देऊन जाईल की, असे भाग्य इतरांच्या नशिबात नाही. शिवाय गुरूचेही तुम्हांला सतत सहकार्य लाभणार आहे.

यापेक्षाही या आठवड्याचे महत्त्व दुसऱ्याच एका वेगळ्या घटनेवर अवलंबून आहे. या वेळची सूर्य-हर्षलयुती तुमच्या लाभस्थानी होणार आहे–अगदी असाच योग तुमच्या हयातीत प्रथमच या आठवड्यात होणार आहे. हा योग अफाट धन देऊन जाईल, काही भव्य-दिव्य असे घडवून आणील. जगाच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील असं काही अलौकिक घडेल.

दि. १८ ते २० या कालावर लक्ष केंद्रित करा.

**धनू** : गुरू भाग्यस्थानी असताना व्ययस्थानातील मंगळाला व चौथ्या शनीला तुमच्याकडे वक्र दृष्टीने पाहण्यापूर्वी १० वेळा तरी विचार करावा लागेल. आता एकट्या गुरूनेच तुमच्या भवितव्याचा ताबा घेतलेला आहे. भाग्यातील गुरू हे भाग्य सध्या फक्त धनुराशी व्यक्तींनाच फक्त लाभलेले आहे.

या आठवड्यातील काही दिवस असे जातील की, तुम्हाला क्षणाची उसंत मिळणार नाही. अनेक कामे हातावेगळी करावी लागतील.

नोकरी धंद्यातील स्थान उंचावेल, आपण जे जे कार्य करीत असाल त्यातील अत्युच्चस्थानी तुमची नियुक्ती व्हावी अशीच या वेळी नियतीची इच्छा दिसते.

दि. १७–१९–२० या काळी अनेक प्रगतीच्या घटना घडाव्यात.

**मकर :** आपल्या राशीच्या भाग्यस्थानी रवि-बुध-हर्षल ही अनन्यसाधारण ग्रहस्थिती या वेळी निर्माण झालेली असल्याने या कालापासून आपल्या कार्यक्षत्राला वेगळाच आकर्षक रंग चढू लागेल. आपल्या जुन्या तंत्रमंत्रात बदल घडून येईल, प्रगतीच्या नव्या मार्गाने वाटचाल सुरू होईल.

अनपेक्षितपणे बदली होईल. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. साहित्य, वृत्तपत्र या व्यवसायातील व्यक्तींना या वेळी प्रचंड उत्थान मिळेल.

आपल्या प्रतिष्ठेची उंची वाढवणाऱ्या अनेक घटना या कालात घडू लागतील. दि. १८ ते २० या कालापासूनच आपल्या कार्याला वेग चढू लागेल.

**कुंभ :** गुरु-शुक्र आपल्या राशीच्या सप्तमात आल्याने, आता आपणांस सहसा कोणत्याही गोष्टीची उणीव भासू शकणार नाही. साडेसातीचे विचार आता मनातून काढून टाका.

अधिकार, सत्ता, हाती येईल. जबाबदारी खूपच वाढू लागेल. आता सहसा तुमचा रस्ता कोणी रोखू शकणार नाही.

आरोग्य सुधारेल, हरवलेले स्वास्थ्य गवसेल. वैचारिक, कौटुंबिक, संघर्ष मिटतील आणि सर्वत्र आपणांस हवे तसे वातावरण दिसू लागेल. या वेळी मनाला खटकणारी गोष्ट एवढीच घडेल की, कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांशी मतभेद वा लागतील.

दि. १९ ते २१ अनुकूल घटना घडून येतील.

**मीन :** मंगळाने तुमच्या मार्गातील बऱ्याचशा अडीअडचणी पूर्वीच दूर केलेल्या आहेत. आता वक्री शनीची फारशी बाधा होऊ शकणार नाही. षष्ठातील गुरूही आपणांस अनेक कार्यांत सहकार्य करू शकेल.

या आठवड्यात दूरचा प्रवास–बदली–बढती अशा घटना भराभर घडून याव्यात.

मुख्यत: वैद्यकीय क्षेत्रात संशोधन विभागात आपणापैकी बऱ्याच व्यक्तींना फारच महत्त्वाचे कार्य करण्याची संधी लाभेल. राजकीय क्षेत्रातील तुमच्या कार्याचा गौरव करण्यात येईल.

दि. १७–१९–२१ या काळी महत्त्वपूर्ण घटना घडाव्यात.

O




## बॅटमिंटन स्पर्धेतील सुखद स्मृती

राज्य पातळीवरील महाराष्ट्राच्या बॅटमिंटन स्पर्धा ऑगस्टच्या अखेरीस पुण्यात उत्साहाने पार पडल्या त्या काही सुखद स्मृती मनात तरळत ठेवूनच. या स्पर्धेत पुरुष आणि महिला विभागातील एकेरी सामन्यात ६७ खेळाडूंनी भाग घेतला. छोटया गटातही ३२ मुलामुलींनी आपले कर्तृत्व पणाला लावले. ज्या रुबाबाने निवृत्त बॅटमिंटनपटू नंदू नाटेकर खेळले त्याच ऐटीत सात–आठ वर्षांच्या चिमुरडया अलका नातूने या स्पर्धेत अस्तित्व दर्शविले.

उंच आणि शिडशिडीत अंगलटीच्या गौर कर्पूरवर्ण गौतम ठक्करचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व, ठेंगण्या नीटनेटक्या आणि चटचट हलणाऱ्या रफिया लतिफचे विजया-प्रमाणे पराभवातही किंचित न बदलणारे स्मितहास्य, चेहऱ्यावर मिस्कील भाव आणीत असता प्रतिस्पर्ध्यांचे डाव शोधण्यात आणि त्यावर प्रतिडाव रचण्यात विचारमग्न झालेले नंदू नाटेकर, स्वप्नाळू वृत्तीतही हिशेबी पाऊल टाकणारे व शांत आणि धीमी हालचाल करणारे अतुल प्रेमनारायण, एखादा छानसा टोला मारल्यानंतर स्वतःवर खूष होऊन कोर्टातच अर्धवर्तुळाकार 'घिरटया' घालणारे अनिल मह्त्रा असे किती खेळाडू सांगावेत !

बेस–लाईनकडे दोन–तीन–चार पावले मागे मागे येत हात उंचावून आणि टाचा वर करून जबरदस्त तडाखे मारणारे किंवा जाळ्याजवळ जाऊन लवचिक मनगटाने शेवटच्या क्षणी हलकेच असे तिरकस ड्रॉप्स टाकून प्रतिस्पर्ध्याला गोंधळात टाकणारे किती तरी सुंदर टोले पाहावयास मिळाले. पण त्यांतही स्वभावदर्शन प्रत्येकाने ओतलेच. नाटेकरांच्या सामर्थ्यात सहजता, तर ठक्कर यांच्या जोमदार टोल्यात डौल होता. शोभा मूर्तींची पावले अचूक पडावयाची आणि बॅकहँड किंवा

**म नो ह र रे गे**

फोरहँडचे फटके तितकेच शास्त्रशुद्ध बसावयाचे. पुण्याचे मलेशियन खेळाडू फिल-फॉट बॅनफॉट जेव्हा चाबकाच्या फटक्याप्रमाणे फूल झोडपीत तेव्हा त्या निर्दयतेला-सुद्धा असामान्यत्वामुळे टाळचा पडत. चेहऱ्यावरची रेषाही न बदलणाऱ्या मुंबईच्या शरयू फळणीकर फूलही नेमके रेषेत टाकीत. पण त्याच फळणीकरांनी रफिया लतिफना एकेरी अंतिम सामना जिंकल्यावर प्रेमाने आणि आनंदाने कडकडून मिठी मारली. तेव्हा खरोखरीच आश्चर्य वाटले. जाणकार आम्हांला सांगत नाटेकर आता पूर्वीचे राहिले नाहीत. पण समोरच्या खेळाडूने झपाट्याने टोलविलेले फूल त्यांच्या अंगावर आले की खांदा किंचितसा बाजूला करून नाटेकर ते फूल सोडून देत आणि अंतिम रेषेबाहेर ते फक्त अर्धा इंच बाहेर पडे! खेळावरचे इतके दैदीप्यमान प्रभुत्व खरोखरीच अवर्णनीय आहे.

महाराष्ट्राचे बॅडमिंटन सामने संपले. आता पुन्हा ते पुढच्या वर्षी होतील. पण उदयोन्मुख खेळाडू त्यांच्यापासून काय शिकले हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. मला नाटेकर किंवा लतिफ यांच्यासारखे खेळता येईल काय, असे किती जणांना वाटले? एकेरी अजिंक्यपद मिळविल्यावर रफिया लतिफना मी विचारले, "काहो, या विषयाबद्दल तुम्हांला काय वाटले?" तेव्हा त्या एवढेच उद्‌गारल्या, "ॲम् प्लीज्ड!" पण शोभा मूर्थींना तुम्ही हरविलेत त्याचे काय? तेव्हा त्या म्हणाल्या "दॅट वॉज माय एम!" गेल्या ऑक्टोबरात आंतर-विद्यापीठ सामन्यात शोभा मूर्थींनी रफिया लतिफचा पराभव केला होता. त्याचा वचपा त्यांनी या वर्षी काढला. नवीन खेळाडू अशी काही जिद्द आणि ईर्षा हे सामने पाहून बाळगतील काय!

## बोर्डेविरुद्धचे वादळ

इंग्लंडच्या क्रिकेट दौऱ्यात चंदू बोर्डे यांनी तीन कसोटी सामन्यांतील ६ डावांत ६० धावा काढल्याबद्दल सर्वांची मोठीच निराशा झाली. सुप्रसिद्ध क्रिकेट-समीक्षक बेरी सर्वाधिकारी यांनी बोर्डे यांच्यामध्ये काही दृष्टिदोष निर्माण झाल्याचे प्रतिपादन केले. दिल्लीच्या 'हिंदुस्थान टाईम्स' या वर्तमानपत्राने तर चांगला तीन कॉलमी मथळा देऊन बोर्डेनी भारताची मानहानी केली असा निर्वाळा दिला. साहजिकच ऑस्ट्रेलियाच्या नोव्हेंबरमधील दौऱ्यावर बोर्डे यांना नेमू नका, असा गहजब सुरू झाला आहे. पण त्यात काही तथ्य नाही.

आयुष्यात असे काही निराशाजनक प्रसंग येतात की, माणूस बेचैन होऊन जातो आणि प्रतिकूल परिस्थितीतच त्याच्या कर्तृत्वाला उजळा मिळत असतो. श्री. विजय मर्चंट यांनी पुण्यात नुकतेच उद्‌गार काढले की, बोर्डे हे भारतातील सर्वोत्कृष्ट तंत्रशुद्ध फलंदाज आहेत. आणि ही गोष्ट कुणालाच नाकारता येणार नाही. पण

बोर्डे यांच्यावर केल्या जाणाऱ्या टीकेत पद्धतशीर कट आणि आपमतलबीपणा दिसतो आहे असे वाटते. वस्तुत: नरी कॉंट्रॅक्टर कसोटी सामन्यांतून बाहेर पडल्या-नंतर बोर्डेनाच भारताचे नेतृत्व देणे योग्य ठरले असते. पण पतौडीच्या नबाबांना ऑक्सफर्डहून उसन मागवून भारताचे कर्णधार करण्यात आले. त्यानंतर भारताने ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडविरुद्ध कसोटी सामन्यांत विजय मिळविले. त्यामुळे पतौडींचा बराच उदोउदो झाला. पण उत्तम नेते म्हणून त्यांनी कधीच नावलौलिक मिळविला नाही.

इंग्लंडच्या दौऱ्यातील भारताच्या पराभवाचे पतौडी हे एक प्रमुख कारण आहेत यात शंका नाही. असे सांगतात की निवड-समितीला या पतौडींनीच मला नाडकर्णी–जयसिंहा नकोत असे स्पष्ट बजावले. जुन खेळाडू संघामधून घालवायचे आणि नव्या खेळाडूंवर आपली हुकमत चालवायची हा पतौडींचा नबाबी खाक्या दिसतो. इंग्लंडच्या दौऱ्यात वेगवान गोलंदाज नाहीत अशी पहिल्यापासून तक्रार करणाऱ्या पतौडींनी देसाई–रांजणे यांच्यासाठी आपले वजन का खर्ची घातले नाही हाही एक प्रश्न आहेच. बरे, हाती असलेल्या संघाचाही त्यांनी नीट उपयोग करून घेतला नाही. गोलंदाजीतील योग्य बदल आणि क्षेत्ररक्षणाची रचना ते परिणाम-कारकरीत्या आखू शकले नाहीत.

'ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात कर्णधार म्हणून जाण्यास आपल्याला वेळ आहे,' असे गेल्या महिन्यात पतौडींनी सांगितले. म्हणजे नेतृत्व न दिल्यास ते जाणारच नाहीत की काय ? यंदा हैद्राबादने पतौडींना टाळून जयसिंहा व बेग यांना संघनायक व उपसंघनायक नेमले आहे. याचा अर्थ भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाने वेळीच ध्यानात घ्यावयास हवा. जो माणूस हैदराबादमध्ये मुरलेला नाही त्याला कसले नेतृत्व असाच सवाल हैदराबादने बोर्डाला टाकला आहे. भारताचे नेतृत्व बोर्डेना देण्यामागे मला जे कारण सुचते ते एकच. बोर्डे खरोखरी भारताचे आहेत, १९५२ सालापासून त्यांनी भारतासाठी जीवापाड कष्ट घेतले आहेत. त्यांच्या डोळ्यांना काहीही झालेले नाही, असे चौकशीअंती समजते. संघातील सर्व खेळाडूंना एकत्र आणून व सहकार्याने वागवून भारताचे ते भले करू शकतील. पतौडींना ते कधीही जमणार नाही. कारण आडात नाही ते पोहऱ्यात कोठून येणार ? ऑस्ट्रेलियाला बोर्डेना भारताचे नेतृत्व देऊन एकदा पाहावे. निवड वाया जाणार नाही.





# पुरंदराच्या बुरुजावरून

छत्रपती शिवाजीमहाराजांना विश्रांती कशी ती माहीतच नव्हती.

स्वराज्याचा संसार समृद्ध आणि समर्थ करण्यासाठी ते अविरत श्रमत होते. थांबत नव्हते. थबकत नव्हते, थकत नव्हते, शेकडो मनसुबे ते जातीने हाताळत होते, अन् मग जेवढे मनसुबे महाराजांना, तेवढेच मनसुबे त्यांच्या चिटणीसांना पेलावे लागत होते. महाराजांचे चिटणीस सावलीसारखे महाराजांच्या मागे असत. महाराजांचा चिटणीस होणं, म्हणजे सूर्याचा सारथी होण्याइतकंच कठीण होतं. पण अशा अवघड चिटणीशीचा दरख बाळाजी आवजी चित्रे मोठ्या जिम्मेदारीने सांभाळीत होते.

महाराजांनी उचललेल्या प्रत्येक राजकारणाचा पहिला भार चिटणीसांच्या खांद्यावर पडायचा. कुणाला पत्रं रवाना करायची. राजकीय पाहुण्यांशी बोलणी करायची. गडकोटांच्या बांधणी–दुरुस्तीची चौकशी–पाहणी करायची. अठरा कारखान्यांची आणि बारा महालांची तहानभूक चिटणीसांनीच पाहायची. शिवाय सतत महाराजांबरोबर राहायचं. सारी गुप्त राजकारणं तडीस न्यायची चिटणीसांनीच. महाराजांच्या खाशा कुटुंबातील कुणाचं लग्न, बारसं, माहेरपण, सासरपण अन् रुसवेफुगवेही चिटणीसांनीच पार पाडायचे. अशी हजार प्रकारची कामं सांभाळता सांभाळता चिटणीसांची कधी कधी अगदी तारांबळ उडायची !

एकदा झाली एक गम्मत. महाराजांनी बाळाजी आवजी चिटणीसांना सकाळीच सदरेवर एका महत्त्वाच्या पत्राचा मजकूर तोंडी सांगितला.

# अवघड चिटणीशी

## ब. मो. पुरंदरे

पत्र जायचं होतं तळकोकणच्या सुभेदाराला. घाईघाईने महाराजांनी त्यांना पत्राचा विषय सांगितला आणि म्हटलं,

" चिटणीस, पत्र लिहून तयार करून ठेवा. उद्या सकाळीच सांडणीस्वार रवाना करायचा आहे. पत्र रात्री आम्ही वाचू. "

" आज्ञा महाराज. पत्र लिहून ठेवतो. "

चिटणीसांनी म्हटलं, आणि ते इतर कामांकडे वळले. कामांची गर्दी रोजच्यापेक्षाही जास्त होती. कारकून, हुजरे, बारदार, लष्करी आणि मुलकी अधिकारी यांची धावपळ सदरेवर चालू होती. क्षणाची उसंत नव्हती. पत्राच्या थैल्या येत होत्या. चिटणीस एक एक थैली उघडून महाराजांना मजकूर वाचून दाखवीत होते, अन् कामं वाढतच होती. वाचलेल्या पत्रावर महाराजांचे नवे नवे हुकूम सुटत होते.

सारा दिवस अशी कामं करण्यात गेला. चिटणीसांची धावपळ उडाली.

रात्र झाली. जेवण झाल्यानंतर चिटणीस पुन्हा सदरेवर महाराजांपुढं हाजीर झाले. महाराज मसनदीवर लोडाशी बसले होते. थोडा दूर एक मशालजी पेटलेली मशाल घेऊन उभा होता. पिवळा-तांबूस उजेड सदरेवर पसरला होता. महाराजांना सकाळच्या ' त्या ' पत्राची आठवण झाली. ते चिटणीसांना म्हणाले,

" चिटणीस, आम्ही सकाळी सांगितलेल्या मजकुराचं पत्र लिहून झालं ?"



" वा वा ! सुरेख पत्र, सुबक कलम ! पाहू बरं जरा थोडं "

चिटणीस चमकले. किंचित चाचरले. कारण ते पत्र लिहून झालंच नव्हतं ! सबंध दिवस चिटणीसांना इतकी कामं होती की, त्यांना ते पत्र लिहायला वेळच मिळाला नाही. महाराज मात्र विसरलेले नव्हते. त्यांनी नेमकं विचारलं,

"––पत्र लिहून झालं ?"

आता 'नाही' म्हणावं तरीही पंचाईत. 'हो' म्हणावं तर लिहून झालेलं नव्हतं. काय करावं ? विचार करायलाही वेळ नव्हता. क्षणभर गोंधळलेल्या चिटणीसांनी आवंढा गिळला आणि ते धाडकन् म्हणाले,

" होय महाराज, पत्र लिहिलं आहे !"

चिटणीसांचा हिशेब असा की, नंतर हळूच लिहून सकाळी थैली तयार ठेवावी, म्हणून ते म्हणाले,

" पत्र लिहून तयार आहे !"

" वाचा !" महाराज लगेच म्हणाले.

महाराज म्हणाले 'वाचा !' पण वाचायचं काय कपाळ ! लिहिलेलंच नव्हतं.

पंत अधिकच चपापले. पण त्यांनी अवधान राखलं. त्यांनी पटकन् रुमालातून एक कोरा कागद काढला आणि तोंडापुढं धरला, बाळाजीपंत पत्र वाचणार म्हणून तो दूर उभा असलेला मशालजी झटकन् जवळ आला. त्याने मशालीवर बुधला धरला. मशाल तेजाळली. मशालजी

चिटणीसांच्या थोड्या शेजारी मशालीचा उजेड धरून उभा राहिला. चिटणीस 'पत्र' वाचू लागले !

"श्रीतुलजाभवानी

अखंडित लक्ष्मीअलंकृत मशहुरूल अनाम राजश्री रामाजी अनंत सुभेदार प्रांत प्रभानवळी प्रती राजश्री शिवाजीराजे दंडवत उपरी..."

चिटणीस एक अक्षरही न अडखळता 'वाचत' होते! महाराज एकाग्रतेने ऐकत होते. तेवढ्यात मशालजीचं सहज लक्ष चिटणीसांच्या पत्रावर गेलं. पत्र कोरंकरकरीत होतं ! मशालजीला आश्चर्यच वाटलं. त्याने जरा मान उंचावून पाहिलं. कोरा कागद पंत घडाघडा वाचत होते ! मशालजीला अगदी न कळत एकदम हसू फुटलं. पंत त्यामुळे अधिकच चपापले. पण मशालजीच्या त्या उस्फुटलेल्या हसण्याने महाराजांची श्रवणसमाधी भंगली. त्यांनी एकदम मशालजीकडे नजर फेकली आणि त्यांनी जरा तिखट सुरांत विचारलं,

"काय झालं ?"

मशालजी दचकलाच. तो घाबरून स्वतःला सावरीत म्हणाला,

"जी, काय नाय महाराज !"

मशालजी भलताच गंभीर झाला. चिटणीसांनी याही गडबडीत आव सांभाळला. महाराज म्हणाले,

"पुढं वाचा चिटणीस !"

चिटणीस पत्र पुढं वाचू लागले. अगदी न अडखळता. न चुकता. सकाळी महाराजांनी सांगितलेला मजकूर चिटणीस सफाईदार भाषेत वाचत होते. महाराजांची मान समाधानाने डोलत होती. पत्र मोठं होतं. पत्रातील मजकूर संपत आला आणि शेवटच्या ओळी चिटणीसांनी वाचल्या,

"...बहुत काय लिहिणे ? तरी तुम्ही सुज्ञ असा, विज्ञापना..."

पत्र संपलं. चिटणीसांच्या कपाळावर घामाचे थेंब जमा झाले होते. पण पत्र ऐकून महाराज खुष झाले होते. ते एकदम म्हणाले,

"वाहवा ! चिटणीस बहुत बहुत उत्तम ! आमच्या तर्जुम्यापेक्षाही तुम्ही कलम केलेला मजकूर मातबर आहे."

चिटणीसांच्या चेहऱ्यावर आनंद छटावला. महाराज कौतुकाचं बोलत

होते. पंतांना आनंद होत होता पत्र निभावल्याचा. तेवढ्यात महाराज म्हणाले,

" वा वा ! सुरेख पत्र ! सुबक कलम ! पाहू बरं जरा थोडं ! "

महाराजांनी हात पुढं करीत पत्र मागितलं ! आता ? चिटणीसांच्या चेहऱ्यावर तारांवळ उडाली. आता काय करावं ? मशालजीचा चेहराही कसनुसा झाला. आता करावं तरी काय ? चिटणीसांची गडबड उडाली.

" पत्र लिहावं तर असं ! द्या ते पत्र ! "

चिटणीसांनी ते पत्र महाराजांच्या हाती दिलं. कोरं पत्र ! करकरीत कोरा कागद ! महाराजांनी कागद पाहिला. कोरा ! उलटून पाहिला. कोराच ! महाराजांना हसू फुटलं. मघाशी मशालवाला खुदकन् का हसला त्याचा उलगडा त्यांना आत्ता झाला. चिटणीस मात्र बावरल्या चेहऱ्याने तळहातावर तळहात फिरवीत उभे होते. महाराजांनी हसऱ्या डोळ्यांनी चिटणीसांकडे पाहिलं. चिटणीस आर्जवी सुरांत म्हणाले,

" महाराज, क्षमा असावी. सबंध दिवस कामाच्या गर्दीत गेला. क्षणाची फुरसद न मिळाली. पत्र लिहायाचं राहिलं. आता रात्री लिहिणारच होतो. "

" पण न लिहिलेला मजकूरही तुम्ही कुशलाईने वाचता हं ! "

महाराज मोकळेपणाने हसले. मशालजीही त्यात अलगद सामील झाला. महाराज मान डोलावीत म्हणाले,

" शाबास, चिटणीस शाबास ! तुमच्यासारखे चिटणीस आम्हांला लाभले. आम्हांला अभिमान वाटतो ! "

कृतार्थतेने चिटणीसांचे डोळे ओलावले होते.



[ कव्हर पान २ वरून ]

अशात कार्यकर्त्यांशी संपर्क, जखमींची सेवासुश्रुषा, रोज पाच सत्याग्रह्यांची तुकडी पाठविण्याच्या कार्यक्रमाचे संयोजन, दिल्ली–अंबाला–अमृतसर वगैरे बाहेरच्या ठिकाणांहून आलेल्या पत्रकारांशी बातचीत, आंदोलनाच्या प्रसिद्धीची सोय, परिपत्रकांचें वाटप . . . अनेक कामे, अनंत व्यवधाने . . .

काश्मीरमधील पंडितांची चळवळ या थरापर्यंत पोचली होती, 'माणूस' प्रतिनिधी पुण्याहून निघून श्रीनगरात दाखल झाला तेव्हा.

जम्मू भागातही चळवळीचा जोर होता.

दिल्लीवर धडका सुरू होत्या.

अतिशय मवाळ व सहनशील म्हणून ओळखला जाणारा काश्मिरी पंडित इतिहासात प्रथमच इतका खवळला होता, उफाळला होता.

⁂

*का ?*

आज जरी आंदोलन तात्पुरते मागे घेतले गेले असले तरी एकूण काश्मीरच्या भवितव्याशीच हा प्रश्न निगडीत आहे.

⁂


*कसा ?*

पुढील अंकापासून काश्मीरची खास वार्तापत्रे . . .

⁂

*'माणूस प्रतिनिधी'कडून*

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649

सारे
जग
श्वास
रोखून
बसेल

असे
बेगुमानपणे
सांगणाऱ्या
हिटलरच्या
झंझावाती
पुरुषार्थाची
कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर